❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | गुरुवार, दि. ०३ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २४९ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# १५०९ पैकी १३७३ गुन्हे मागे घेतले

## मराठा आरक्षणप्रकरणी सरकारच्या शिष्टमंडळाची पत्रकार परिषद : ५८ लाख नोंदींचा डेटा तयार



■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती समोर आली आहे. सरकारच्या शिष्टमंडळातील मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेत मराठा समाजाच्या मागण्यांवर सरकारने केलेल्या कामांचा आढावा मांडला. मराठवाड्यात कुणबी प्रमाणपत्रासाठी 58 लाख नोंदींचा डेटा संकलित करण्यात आला असून, आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या 1509 गुन्ह्यांपैकी 1373 गुन्हे मागे घेण्यात आले आहेत, अशी माहिती सरकारकडून देण्यात आली. सरकारने मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र मराठा कक्ष स्थापन केला असून प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच 10 सप्टेंबर ते 17 सप्टेंबरदरम्यान 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' राबवून 58 लाख नोंदींशी संबंधित नागरिकांचे अर्ज आणि कागदपत्रांची पूर्तता तातडीने करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. या पत्रकार परिषदेत सरकारने मराठा आरक्षणाच्या प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगत देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात गायकवाड आयोगाची स्थापना, त्यानंतरचे 16 टक्के आरक्षण आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना देण्यात आलेले 10 टक्के एसईबीसी आरक्षण याचा उल्लेख केला. मराठा समाजाकडून सातत्याने मांडल्या जाणाऱ्या 58 लाख कुणबी नोंदींच्या मुद्द्यावर सरकारने महत्त्वाची माहिती दिली. सरकारच्या म्हणण्यानुसार, मराठवाड्यातील जुन्या नोंदींच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या स्थापनेनंतर मराठवाड्यात सुमारे 3.5 लाख प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. सरकारने 58 लाख नोंदींचा डेटा संकलित करून त्याची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे या नोंदींचा संपूर्ण डेटा असलेला पेनड्राइव्ह देण्यात आल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली. आता या नोंदींमध्ये ज्या नागरिकांच्या पूर्वजांच्या नोंदी आढळतात, त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज केल्यास प्रशासनाकडून नियमाप्रमाणे तातडीने कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले.

### हैदराबाद गॅझेटनुसारही प्रक्रिया सुरू

हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी आतापर्यंत सुमारे 3.5 हजार अर्ज प्राप्त झाल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली. यापैकी काही अर्जांवर कार्यवाही करण्यात आली असून, पात्र अर्जदारांना प्रमाणपत्र देण्यात आले आहे. काही अर्जांमध्ये कागदपत्रांची पूर्तता आवश्यक असल्याने त्यावर पुढील कार्यवाही सुरू आहे. वंशावळ किंवा वंशसंबंध सिद्ध करण्यासाठी गावपातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांच्या माध्यमातून संबंधित अर्जांची तपासणी करून पुढील प्रक्रिया करण्याचे काम सुरू असल्याचे सरकारने स्पष्ट केले.

# विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द होणार


## उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली, ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का

■ मुंबई (दै. संध्या)



उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला असून विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द होणार आहे. पालघरच्या जात पडताळणी समितीने कुणबी प्रमाणपत्र रद्द ठरवल्यानंतर विशाखा राऊत यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ती याचिका आता उच्च न्यायालयाने फेटाळल्याने तो ठाकरेंच्या शिवसेनेसाठी मोठा धक्का असल्याचं मानलं जात आहे. ठाकरेंच्या शिवसेनेच्या विशाखा राऊत यांनी दादरमधील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या वॉर्ड क्रमांक 191 मधून निवडणूक लढवली होती. राऊत यांनी शिंदेंच्या शिवसेनेचे माजी आमदार सदा सरवणकरांची कन्या प्रिया सरवणकर गुरव यांचा पराभव केला होता. मात्र आता विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द होणार आहे. विशाखा राऊत यांचे ओबीसी प्रमाणपत्र हे अवैध असल्याचा निर्णय पालघरच्या जात पडताळणी समितीने दिला होता. त्यानंतर विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द झाल्याचा निर्णय जाहीर करावा, असं पत्र मुंबई महापालिकेने राज्य सरकारला लिहिलं होतं. मात्र महापालिकेच्या या पत्रव्यवहारावर आक्षेप घेत विशाखा राऊत यांनी त्याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. आता ती याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्याने विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द होणार आहे. पालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांनी 25 ऑगस्ट रोजी राज्याच्या नगरविकास विभागाच्या अपर मुख्य सचिवांना याबाबत पत्र पाठवले आहे. जात प्रमाणपत्र अवैध ठरवण्याचा निर्णय 20 ऑगस्ट रोजी घेण्यात आला होता. त्यानंतर मुंबई महापालिका अधिनियमातील तरतुदीनुसार राऊत यांची नगरसेवक म्हणून झालेली निवड रद्द झाल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. तसेच, नगरसेवक पद रद्द झाल्यामुळे पुढील सहा वर्षे नगरसेवक पदाची निवडणूक लढवण्यास त्या अपात्र ठरल्याचेही महापालिका आयुक्तांनी पत्रातून स्पष्ट केले आहे. ही बाब महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्याची विनंती आयुक्तांनी केली आहे. विशाखा राऊत यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्याला आव्हान देण्यासाठी राऊत यांच्याकडे 90 दिवसांचा अवधी आहे. दरम्यान, महापालिकेने त्यांचे नगरसेवकपद रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. राऊत यांचे नगरसेवकपद रद्द करावं अशी मागणी करत शिंदेंच्या शिवसेनेचे माजी आमदार सदा सरवणकरांनी महापालिका आयुक्तांची भेट घेतली होती.

### संध्या प्रहार




# आंदोलन चिरडण्याचा आदेश अमित ठाकरेंनी बंगल्यात बसून दिले : संतोष धुरी

■ मुंबई (दै. संध्या)



पुण्यातील शासकीय तंत्रशिक्षण महाविद्यालयातील पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो मनसे कार्यकर्त्यांनी हटवल्यानंतर त्याचे राजकीय पडसाद उमटत आहेत. भाजपने केलेल्या आंदोलनानंतर आता एकेकाळी राज ठाकरेंचे निकटवर्तीय असलेल्या आणि आता भाजपमध्ये गेलेल्या संतोष धुरी यांनी अमित ठाकरे यांच्यावर टीका केली. तुम्ही कांड करता आणि मनसैनिकांना कामाला लावता. अमित ठाकरे यांनी बंगल्यात बसून भाजपचे आंदोलन चिरडण्याचा आदेश दिला, असे आरोप संतोष धुरी यांनी केले. भाजपचे नेते संतोष धुरी म्हणाले की, "तुम्ही जर म्हणत असाल याच्या शेजारी त्याचा फोटो नको, त्याच्या शेजारी याचा फोटो नको, तर मग शिवाजी पार्क मध्ये लागलेले बॅनर बघा. ज्या ठिकाणी संभाजी महाराजांचा फोटो आहे आणि त्याच ठिकाणी अमित ठाकरेंचा फोटो आहे. आपली तुलना कुठल्या महापुरुषासोबत केली गेली नाही पाहिजे, हे तुम्हाला कळले पाहिजे. शिवाजी पार्कवर तुमचे पोस्टर तुमचे कार्यकर्ते लावतात की आणखी कोण, यावर तुमचं लक्ष नाही का?" भाजप युवा मोर्चाचे लोक तुमचा निषेध करणार होते, तुमच्या विरोधात घोषणाबाजी करणार होते. पण अमित ठाकरे यांनी बंगल्यामध्ये बसून आदेश काढले की, जा आणि यांचं आंदोलन चिरडून टाका. भाजप युवा मोर्चाचं आंदोलन कुठे होतं आणि शिवतीर्थ कुठे होतं? असा सवाल संतोष धुरी यांनी केला. संतोष धुरी यांनी यावेळी मनसेवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, "ज्या पक्षाने चूक केली त्याच पक्षाने आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला. भांडण केली, मारामारी केली. आदेश दिल्यानंतर सैनिक धावत गेले आणि हे स्वतः बंगल्यामध्ये बसले. कामाला सैनिकांना लावलं. निष्पाप सैनिकांना कामांना लावता. नरेंद्र मोदींचा फोटो काढायला तुम्ही सांगितलं आणि त्याची केस कार्यकर्त्यांवर पडली. आता केस ते लढवणार. तुम्ही स्वतः सांगायला पाहिजे जे झाले ते चूक झाले. तुमची तुलना संभाजी महाराजांसोबत झाली हे चूक झाले, हे सुद्धा सांगा."

# पद्मसिंह पाटील यांच्या निर्दोष सुटकेला हायकोर्टात आव्हान

### आरोपींना नोटीस, दोन दशकांनंतरच्या लढ्याला नवे वळण

■ मुंबई (दै. संध्या)



काँग्रेसचे तत्कालीन नेते पवनराजे निंबाळकर आणि त्यांच्या चालकाच्या हत्येप्रकरणी विशेष सीबीआय न्यायालयाने दिलेल्या निर्दोष सुटकेच्या निर्णयाविरोधात निंबाळकर कुटुंबीयांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी म्हणून आरोप असलेले राज्याचे माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह इतर आरोपींना निर्दोष ठरवण्यात आले होते. आता या निर्णयाला आव्हान देणाऱ्या अपिलाची उच्च न्यायालयाने दखल घेत सर्व संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावून त्यांची बाजू स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

पवनराजे निंबाळकर हत्याप्रकरणातील मूळ तक्रारदार आणि शिवसेनेचे धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या आई आनंदीदेवी निंबाळकर यांनी हे अपील दाखल केले आहे. मंगळवारी न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने राज्य सरकारसह पद्मसिंह पाटील आणि अन्य आरोपींना नोटीस बजावून उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. पवनराजे निंबाळकर हत्याप्रकरणाचा दीर्घकाळ चाललेला खटला 20 जून 2026 रोजी निकालात निघाला होता. विशेष सीबीआय न्यायालयाचे न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी पद्मसिंह पाटील यांच्यासह या प्रकरणातील अन्य आरोपींची संशयाचा फायदा देत निर्दोष सुटका केली होती. या आरोपींमध्ये सतीश मंदाडे, मोहन शुक्ला, शशिकांत कुलकर्णी, कैलास यादव, दिनेश तिवारी, पिंटू सिंग आणि छोटे पांडे यांचा समावेश होता. तपास यंत्रणेच्या आरोपानुसार पिंटू सिंग हा या हल्ल्यातील प्रमुख हल्लेखोर होता. या प्रकरणातील पारसमल जैन हा सुरुवातीला आरोपी होता; मात्र नंतर तो माफीचा साक्षीदार बनला. विशेष न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले होते की, पवनराजे निंबाळकर आणि पद्मसिंह पाटील हे राजकीय प्रतिस्पर्धी होते, तसेच दोघांनी एकमेकांविरोधात विविध तक्रारी आणि प्रतितक्रारी दाखल केल्या होत्या. मात्र, केवळ राजकीय वैमनस्य असल्याच्या आधारावर हत्या कटाचा आरोप सिद्ध होत नाही. पवनराजे यांच्या हत्येचे मुख्य सूत्रधार पद्मसिंह पाटीलच होते, हे सिद्ध करण्यासाठी सीबीआयला पुरेसे आणि ठोस पुरावे सादर करता आले नाहीत, असे न्यायालयाने नमूद केले होते.

या खटल्यात पारसमल जैनची साक्ष महत्त्वपूर्ण मानली जात होती. तपास यंत्रणेने त्याच्या जबानीच्या आधारे हत्या कटाबाबत अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले होते. मात्र, विशेष न्यायालयाने त्याच्या साक्षीतील अनेक बाबींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. न्यायालयाच्या निरीक्षणानुसार, ताब्यात घेतल्यानंतर पारसमल जैनला सुमारे 15 दिवस बेकायदेशीरपणे कोठडीत ठेवण्यात आले होते. त्या काळात त्याचा छळ झाल्याचा मुद्दाही समोर आला होता. त्याचबरोबर त्याने वेळोवेळी आपले कबुलीजबाब बदलले होते. त्यामुळे त्याच्या जबानीत मोठ्या प्रमाणात विसंगती असल्याचे न्यायालयाने म्हटले होते. यामुळे पारसमल जैनची साक्ष पूर्णपणे विश्वासार्ह मानता येणार नाही, असा निष्कर्ष विशेष सीबीआय न्यायालयाने काढला होता.

## थोडक्यात...

### राममंदिराचे पहिले CEO बनले जितेंद्र मिश्रा

अयोध्या : दैनिक संध्या

श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची अयोध्या राम मंदिराचे पहिले CEO (मुख्य कार्यकारी अधिकारी) म्हणून नियुक्ती केली आहे. बुधवारी झालेल्या ट्रस्टच्या बैठकीत त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. देवरियाचे रहिवासी जितेंद्र मिश्रा यांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये पश्चिम वायु कमांडचे नेतृत्व केले होते. त्यांनी या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली होती, ज्यासाठी त्यांना 'सर्वोत्तम युद्ध सेवा मेडल'ने सन्मानित करण्यात आले होते. अलीकडेच एका पॉडकास्टमध्ये त्यांनी सांगितले होते की, भारतीय वायुसेनेने पाकिस्तानचे रडार आणि कमांड सेंटर्स कसे नष्ट केले आणि शत्रूच्या हवाई संरक्षण प्रणालींना कसा चकमा दिला. याव्यतिरिक्त, बैठकीत दिल्लीचे महेश भागचंदका, अयोध्येचे वकील मदन मोहन पांडे आणि RSS शी संबंधित शिकोहाबादच्या निर्मला यादव यांना विश्वस्त (ट्रस्टी) बनवण्यात आले आहे. यासोबतच निर्मला यादव ट्रस्टच्या पहिल्या महिला सदस्य बनल्या आहेत.

### दिशा सालियन प्रकरणाचा तपास CBIकडे

मुंबई : दैनिक संध्या

दिवंगत सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपवण्याचा अत्यंत महत्त्वाचा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. या प्रकरणात भारतीय न्याय संहितेच्या तरतुदींनुसार गुन्हा दाखल करून सीबीआय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे थेट निर्देश न्यायालयाने दिले आहेत. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासातील गंभीर त्रुटींवर बोट ठेवत, न्यायालयाने दिशाच्या वडिलांच्या याचिकेवर हा निर्णय सुनावला. याचिकेवरील सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. निकाल जाहीर करताना खंडपीठाने सीबीआयला स्पष्ट मार्गदर्शक सूचना दिल्या.

# शिंदेंच्या युक्तिवादात पहिल्याच वाक्यात बाळासाहेबांचं नाव

## *पक्ष कुणाचा हे निवडणूक आयोगच ठरवणार; शिंदेंचीच शिवसेना मूळ पक्ष, वकिलांचा युक्तिवाद*

■ मुंबई (दै. संध्या)



शिवसेना प्रकरणात निवडणूक आयोगाने जो निर्णय दिला तो योग्यच असून निवडणूक आयोगाला तसा अधिकार आहे, असा जोरदार युक्तिवाद एकनाथ शिंदे यांचे वकील नीरज किशन कौल यांनी केला. बाळासाहेब ठाकरे हयात असतानाही निवडणूक आयोगाने हा अधिकार वापरला होता, असा दावाही कौल यांनी केला. उद्धव ठाकरे यांनी पक्षातील लोकशाही संपवून सर्व अधिकार स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केला, त्यानंतर पक्षात असंतोष निर्माण झाला, असं कौल यांनी न्यायालयात सांगितलं. बाळासाहेब ठाकरे यांनी निवडणूक आयोगाचे अधिकार मान्य केले होते. 1999 सालची घटना निवडणूक आयोगासमोर आणल्यानंतर निवडणूक आयोगाने त्यामध्ये काही बदल करण्याच्या सूचना केल्या होत्या. ते मान्य करत बाळासाहेब ठाकरे यांनी निवडणूक आयोगाचे अधिकार मान्य केले होते, असा युक्तिवाद एकनाथ शिंदे यांच्या वकिलांनी केला. 2018 साली उद्धव ठाकरे यांनी त्या घटनेमध्ये बदल केला, जो अवैध होता, असाही युक्तिवाद त्यांनी केला.

पक्षघटना योग्य आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार हा निवडणूक आयोगाला आहे. त्यामुळेच त्यांनी 2018 सालची घटना ही योग्य नव्हती असा निर्णय दिला, असा दावा एकनाथ शिंदे यांच्या वकिलांनी केला. शिवसेनेच्या विचारांच्या विरोधात असलेल्या पक्षाशी युती करण्याचा निर्णय उद्धव ठाकरे यांनी घेतला होता. त्यामुळे पक्षात एक प्रकारचा असंतोष निर्माण झाला होता, असा दावा शिंदेंच्या वकिलांनी केला. त्याआधारेच एकनाथ शिंदे यांनी आपलाच पक्ष मूळ शिवसेना असल्याचा दावा केल्याचं वकिलांनी सांगितलं.

राजकीय पक्ष कोणता आहे हे ठरवताना विधिमंडळातील आमदारांची संख्या पाहणे गरजेचं आहे असं या आधी सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे. त्यामुळेच शिवसेनेच्या प्रकरणात विधिमंडळातील आमदारांची संख्या निवडणूक आयोगाने लक्षात घेतली, असा युक्तिवाद शिंदेंच्या वकिलांनी केला. राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष हे दोन वेगवेगळे मुद्दे असले तरी जर राजकीय पक्षात मतभेद असतील तर पक्ष कुणाचा निर्णय हा पक्षाच्या संविधानाच्या आधारे घ्यायचा असतो. मग पक्षाचं संविधान योग्य की अयोग्य, त्याच्या आधारे मूळ पक्ष कोणता हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाचा असतो, असा युक्तिवाद एकनाथ शिंदे यांच्या वकिलांनी केला. पक्षाचे चिन्ह या मुद्द्यावर माझे आणि मनिंदर सिंग यांचे युक्तिवाद असतील. अपात्रतेच्या मुद्द्यावर तुषार मेहता युक्तिवाद करतील. आमच्याकडून मांडण्यात येणारा प्रमुख युक्तिवाद असा आहे की, निवडणूक आयोगाने पक्षाच्या घटनेचा विचार करण्यासाठी एका अशा अधिकारक्षेत्राची निर्मिती केली, ज्याचा यापूर्वी कोणताही आधार नव्हता.

1994 पासून निवडणूक आयोगाने विविध आदेशांद्वारे तसेच राजकीय पक्षांशी केलेल्या पत्रव्यवहारातून त्यांना सातत्याने सांगितले आहे की, राजकीय पक्षांच्या घटना लोकशाही पद्धतीच्या असणे आवश्यक आहे. यामागील कारण असे की, जर पक्षाच्या कारभारात तदर्थपणा किंवा मनमानी असेल, तर पक्षातील बहुमत कोणाचे आहे, हे ठरवायचे कसे? निवडणूक आयोगाने यापूर्वीच स्पष्ट केले होते की, राजकीय पक्षामध्ये निवडणुका झाल्या पाहिजेत आणि एक-दोन व्यक्तींनी पक्षातील बहुसंख्य सदस्यांची नियुक्ती करता कामा नये. राजकीय पक्षांनी त्यांच्या पक्षघटना लोकशाही पद्धतीच्या असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

> शिवसेनाप्रमुख पद हे 2013 पर्यंत होतं. पण बाळासाहेब ठाकरेंच्या नंतर हे पद गोठवण्यात आलं होतं. त्यानंतर शिवसेना कार्याध्यक्ष हे पद अस्तित्वात आलं. उद्धव ठाकरे कार्याध्यक्ष असताना शिवसेनेत पक्षांतर्गत निवडणुका घेण्यात आल्या नाहीत. ती जबाबदारी कुणाची होती? या चुका उद्धव ठाकरे यांनी सुधारायला हव्या होत्या, असा युक्तिवाद शिंदेंच्या वकिलांनी केला.

# भर रस्त्यात आई-वडिलांना मारहाण

■ पुणे (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात वृद्ध आई-वडिलांना त्यांच्या दोन मुलांनी लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आईच्या नावावरील जमीन विकल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून दोन्ही मुलांनी आई-वडिलांना रस्त्यावरच बेदम मारहाण केली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी इंदापूर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना रविवारी, 30 ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास इंदापूर तालुक्यातील तरंगवाडी येथे घडली. संजय तुकाराम राऊत आणि राजेंद्र तुकाराम राऊत अशी गुन्हा दाखल झालेल्या दोन्ही मुलांची नावे आहेत. तर तुकाराम किसन राऊत (वय 65) यांनी आपल्या मुलांविरोधात पोलिसांकडे तक्रार दिली आहे. तुकाराम राऊत हे पत्नी अंजना यांच्यासोबत सरस्वतीनगर परिसरात राहतात. त्यांची दोन्ही मुले स्वतंत्रपणे आपल्या कुटुंबासह राहतात. रविवारी सायंकाळी तुकाराम राऊत हे आपली आजारी पत्नी अंजना यांच्यासोबत तरंगवाडी गावच्या हद्दीत फिरण्यासाठी गेले होते. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास दोन्ही मुले टाटा नेक्सॉन कारमधून त्या ठिकाणी आली. आई अंजना यांच्या नावावरील जमीन का विकली, असा जाब दोघांनी आई-वडिलांना विचारला. याच मुद्द्यावरून त्यांच्यात वाद झाला आणि त्यानंतर परिस्थिती चिघळल्याचा आरोप फिर्यादीमध्ये करण्यात आला आहे.

## संपादकीय

# विकासाच्या वाटेवर समाजाचा सहभागही तितकाच महत्त्वाचा!

आजचा भारत झपाट्याने बदलत आहे. शहरांचा विस्तार होत आहे, तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे, पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक होत आहे आणि विकासाची नवी दारे खुली होत आहेत. मात्र विकास म्हणजे केवळ उंच इमारती, रुंद रस्ते, उड्डाणपूल किंवा मोठमोठे प्रकल्प नव्हेत. विकासाचा खरा अर्थ नागरिकांच्या जीवनमानात झालेली सकारात्मक सुधारणा हा आहे. त्यामुळे शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्याबरोबरच समाजाचा सक्रिय सहभागही तितकाच आवश्यक आहे. विकासकामांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. योजना आखल्या जातात, प्रकल्प सुरू होतात आणि प्रशासन त्यांची अंमलबजावणी करते. परंतु एखाद्या भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी स्थानिक नागरिकांच्या गरजा, समस्या आणि अपेक्षा समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नागरिकांनी केवळ समस्या मांडणारे नव्हे, तर त्या सोडविण्याच्या प्रक्रियेत सहभागी होणारे घटक बनणे ही काळाची गरज आहे.

आज शहरांसमोर वाहतूक कोंडी, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन, प्रदूषण, अनधिकृत बांधकामे, सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य सुविधा आणि वाढती लोकसंख्या अशा अनेक समस्या आहेत. या समस्यांवर केवळ प्रशासनाच्या माध्यमातून कायमस्वरूपी तोडगा निघू शकत नाही. नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. रस्त्यावर कचरा न टाकणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, वाहतूक नियमांचे पालन करणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे हीदेखील विकासाचीच कामे आहेत. लोकशाहीमध्ये निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून विकासाची अपेक्षा करणे हा नागरिकांचा अधिकार आहे. मात्र त्याच वेळी विकासकामांबाबत विधायक सूचना देणे, कामांच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवणे आणि गैरप्रकार आढळल्यास कायदेशीर मार्गाने आवाज उठविणे ही नागरिकांची जबाबदारीही आहे. टीका ही लोकशाहीचा महत्त्वाचा भाग आहे; परंतु केवळ विरोधासाठी विरोध करण्यापेक्षा सकारात्मक आणि तथ्याधारित भूमिका अधिक परिणामकारक ठरते. विशेषतः तरुण पिढीने विकास प्रक्रियेत पुढाकार घेण्याची गरज आहे. डिजिटल तंत्रज्ञानामुळे प्रशासनाशी संवाद साधणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे. सामाजिक माध्यमांचा वापर केवळ आरोप-प्रत्यारोपांसाठी न करता जनजागृती, समस्या मांडणी आणि सामाजिक उपक्रमांसाठी केला तर त्याचा मोठा सकारात्मक परिणाम होऊ शकतो. विकासाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सर्वसमावेशकता. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, विद्यार्थी आणि कामगार यांच्या गरजा लक्षात घेऊन विकासाचे नियोजन झाले पाहिजे. एखादा प्रकल्प किती मोठा आहे यापेक्षा त्याचा फायदा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत किती पोहोचतो, हे अधिक महत्त्वाचे आहे.

आज विकासाच्या नावाखाली पर्यावरणाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्तीही चिंताजनक आहे. रस्ते आणि इमारती आवश्यक आहेत; परंतु त्याचबरोबर झाडे, पाणी, मोकळी मैदाने आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षणही तितकेच आवश्यक आहे. पुढील पिढ्यांचा विचार करून विकासाचे नियोजन करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने शाश्वत विकास.

शासनाने पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि वेळेत काम पूर्ण करण्यावर भर दिला पाहिजे. लोकप्रतिनिधींनी जनतेशी सातत्याने संवाद ठेवला पाहिजे. प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या पाहिजेत आणि नागरिकांनीही आपल्या हक्कांसोबत कर्तव्यांची जाणीव ठेवली पाहिजे. या चारही घटकांमध्ये समन्वय निर्माण झाला तर विकासाची गती निश्चितच वाढेल. आज समाजासमोर मोठ्या संधी आहेत.

## गुरु वचन

### जीवनाचे चार आधार

सुसंस्कारितेचे चार आधार आहेत– समजुतदारपणा, प्रामाणिकपणा, जबाबदारपणा आणि शूरपणा. यांना आध्याात्मिक–आंतरिक वरिष्ठतेच्या दृष्टीत तेवढेच महत्वाचे मानले गेले पाहिजे जेवढे शरीरासाठी अन्न, पाणी, वस्त्र आणि निवारा अनिवार्य समजले जाते. समजुतदारपणाचा अर्थ असा की, दूरदर्शी विवेकशीलता अवलंबिणे. एरवी लोक तात्पुरत्या फायद्यालाच सर्वस्व मानतात. तो मिळविण्यासाठी चुकीचे पाउलही उचलतात. त्यामुळे भविष्य अंधकारमय बनते.

गुन्हेगारी घटक याच मनोवृत्तीचे असतात.दूरदर्शिता, विवेकशीलता अनुभवी शेतकऱ्याच्या कामासारखे आहे. ज्यानुसार शेत नांगरणे, बीज पेरणे, खत पाणी देणे, देखभाल करण्यात सुरूवातीचे नुकसान आणि कष्ट सहन केले जातात. दूरदर्शिता सांगते की, याचे फळ काळानुसार मिळणार आहे.

एका बीजाच्या दाण्याच्या बदल्यात अनेक पट दाणे मिळणार आहेत. संयम आणि सत्कार्य अशीच बुद्धिमत्ता आहे. पुण्य परमार्थात भविष्य उज्ज्वल बनविणारी शक्यता अंतर्भूत असते. संयमाचे फळ वैभव आणि पौरुषाच्या रूपात दृष्टिंगत होणार असते. दूर्बिणच्या आधारे दूरपर्यंतची वस्तु पाहिली जाऊ शकते आणि त्या माहिती आधारे अधिक बुद्धिमत्तापूर्ण निर्णय घेतला जाऊ शकतो. अध्यात्माच्या भाषेत यालाच तृतीय नेत्र खुलणे म्हणतात. त्या आधारे संकटापासून वाचणे आणि उज्ज्वल भविष्याची निर्मिती शक्य आहे.

कथनी–करनी एक ठेवणे यास प्रामाणिकपणा म्हणतात. सहयोग व सद्भाव अर्जित करण्यासाठी प्रामाणिमपणा प्रमुख आधार आहे. याला आपल्या व्यवसायात स्वीकारून अनेक लोकांनी मोठे यश मिळविले आहे. मोठी जबाबदारी उपलब्ध करणे आणि ती पार पाडण्यात प्रामाणिकपणा यश देतो.

सुसंस्कारितेचा तिसरा भाग आहे जबाबदारी. बेजबाबदार उत्तरदायित्वापासून निर्लज्जतापूर्वक इंकार करू शकतात. मात्र जबाबदार लोकांना आपले उत्तरदायित्व नियमबद्धपणे पार पाडता येते. जो आरोग्य सुरक्षित ठेवण्याचा जीवन संपदेचा श्रेष्ठतम सदुपयोग करण्याचा, लोक परलोक उत्कृष्ट बनविण्याची जबाबदारी पार पाडतो, तोच संतोष, यश आरोग्याचा लाभ प्राप्त करू शकतो. चौथा व अंतिम टप्पा आहे– शूरपणा. दैनिक जीवनात अनेकानेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी साहस आवश्यक आहे. अन्यथा गडबडीत योग्य उपाय सुचणार नाही.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 2 | 4 | | | | 7 | 3 |
| 5 | 4 | | 2 | | | | 9 | |
| | | | | 5 | 1 | 2 | | 4 |
| | | 7 | 8 | | 9 | | | |
| | 8 | | 6 | | 3 | | 1 | |
| | | | 7 | | 5 | 8 | | |
| 3 | | 6 | 1 | 9 | | | | |
| | 2 | | | | 6 | | 3 | 9 |
| 8 | 1 | | | | 2 | 4 | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०५७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 5 | 7 | 9 | 1 | 3 | 2 | 6 | 4 |
| 6 | 3 | 1 | 8 | 2 | 4 | 9 | 7 | 5 |
| 9 | 4 | 2 | 6 | 7 | 5 | 3 | 8 | 1 |
| 3 | 2 | 8 | 4 | 9 | 1 | 7 | 5 | 6 |
| 1 | 7 | 5 | 3 | 6 | 2 | 8 | 4 | 9 |
| 4 | 6 | 9 | 7 | 5 | 8 | 1 | 3 | 2 |
| 2 | 9 | 6 | 5 | 8 | 7 | 4 | 1 | 3 |
| 5 | 8 | 3 | 1 | 4 | 9 | 6 | 2 | 7 |
| 7 | 1 | 4 | 2 | 3 | 6 | 5 | 9 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११८९ – सिंहहृदयी रिचर्डचा (पहिला रिचर्ड– रिचर्ड दलायन हार्ट) राज्याभिषेक. या समारंभाच्या वेळी वेस्ट मिनिस्टर ॲबेमध्ये एक वटवाघूळ शिरले. तो अपशकुन समजून इंग्लंडमध्ये नागरिकांनी दंगे केले.
- १७५२ – इंग्लंडमध्ये या वर्षी ३ ते १३ सप्टेंबर हे ११ दिवस दिनदर्शिकेतून वगळण्यात आले. २ सप्टेंबर संपला आणि १४ सप्टेंबरपासून इंग्लंडमध्ये ग्रेगोरियन कालगणना सुरू झाली.
- १७८३ – व्हर्साय इथल्या शांतता करारानुसार फ्रान्सने अमेरिकेस स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता दिली.

### राष्ट्रीय

- २००७ – गुजरातच्या भडूच जिल्ह्यात एक टाटा सूमो आणि राज्य परिवहन मंडळाच्या बसदरम्यान धडक होऊन १२ जण ठार झाले असून अनेक जण जखमी झाले.


### जन्म

- १८६९ – फ्रिट्झ प्रेगल, नोबेल पारितोषिकविजेत्या, रसायनशास्त्र, मूलद्रव्यांचा अणुभार मोजण्याचे तंत्र त्यांनी निर्माण केले.
- १८७८ – सर हॅरॉल्ड हार्टली, स्फोटकाचे संशोधक.

### निधन

- १९४५ – केडगावचे नारायण महाराज.
- १९५३ – लयभास्कर लक्ष्मणराव पर्वतकर खाप्रूमामा, तबलावादक.
- २००६ – वॉरेन मिटोपस्की, एक्जिट पोलचे जनक.
- २००६ – भालचंद्र वराळे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सन्मानीय सदस्य, माजी न्यायमूर्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी बळवंतराव वराळे यांचे ज्येष्ठ पुत्र.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५८



**आडवे शब्द**

१. संत्र्यांचे शहर!
४. आतील गोटातील
७. मर्यादा
११. दशरथपुत्र
१२. सोबत, संगत
१३. भारतीय चलन
१५. धनुष्याच्या दोरीचा आवाज
१६. श्वापद, १८. रत्न
१९. पारोपकार म्हणजे पुण्य असेल तर परपीडा म्हणजे–
२०. घातलेली भीड
२१. उगीच
२४. सामोपचार
२६. नेहमी, अखंड
२८. छोटी लढाई
३०. मानसन्मान
३२. भांडण
३४. पाण्याचा उसळलेला तरंग
३५. आमटी, वरण घेण्याचे पात्र
३६. नवीन
३७. मजबूत, दणकट
३९. वस्त्र, वसन
४०. फूल
४३. कोवळा अंकुर
४४. व्रत
४६. पाठपुरावा, शोध
४७. एकदम उडालेली धार
४८. कडक व चिवट
४९. तात, जन्मदाता
५०. यमलोक
५१अ. निकाली शेवट
५२. अनाठायी धाडस
५४. पप्पा, डॅडीपेक्षा हे संबोधन चांगले
५५. शाब्दिक चकमक
५९. अलमारी
६१. क्रिया घडवून आणणारा, सहाय्यक
६३. सावकाश, हळू
६४. अमावस्या
६६. विरुद्ध, उलटे
६९. बाज, खाट
७२. पातळ खांब
७३. गोष्टी सांगणे
७६. घालमेल
७८. क्रमांक
७९. मृत्यूदेवता
८१. गाडीचे छत
८३. सैन्याचा माल पुरवठा
८४. अफरातफर, गैर उद्योग
८५. प्रतिबिंब दाखवणारा

**उभे शब्द**

१. निराश, रूसलेला
२. येरझारा, जाणेयेणे
३. खोडण्याचे साधन
४. आकाश
५. शहाणा, हुशार
६. झाड
७. मूळ आधार
८. वितरण
९. वाळवंट
१०. अखेरीस
१४. सांभाळणारा
१७. माराची उमटलेली खूण
१९. स्वयंपाकाचे शास्त्र
२२. नृत्य
२३. दरिद्री, कंगाल
२४. चीजवस्तू
२५. भर, राडारोडा
२६. कारण
२७. छोटी ताटली
२९. जुगाराचा प्रकार
३१. चिंतन
३३. पादत्राण
३५. पूर्वज
३८. मंगलाष्टकातील पालुपद
४१. गंगेचे वाहन मानलेला जलचर
४२. शिव्याशाप
४५. फळावरील आवरण
४७. ममता, प्रेम
४७अ. प्रकरण
४८. चणचण, उणीव
५१. प्रवचनकार
५२. दिवसातून वा हंगामातून दोन वेळा
५३. खटला दाखल करणारा
५४. भलताच कठीण (प्रसंग)
५६. भांडण
५७. ढीग
५८. रविवार
६०. पाप
६२. चषक
६५. बडबड
६७. अर्धी ओंजळ
६८. पुष्पदल
७०. रावणाचे राज्य
७१. खादाड राक्षस
७४. थापा मारणारा
७५. डोळे
७७. आनंद
८०. नंतर
८२. टप्पा

**जम्बो शब्दकोडे क्र. १०५७ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.वळीव ३.मस ४.पराभव ७.राम ९.सावकार १०.वरपक्ष १२.पर १३.कापडचोपड १६.तपन १८.रासगरबा १९.खोपट २०.वाद २१.बाराखडी २३.खेटर २४.भरभर २६.पोप २७.तप २९.साक्ष ३०.संगीत ३२.दादला ३५.रम्य ३६.नशा ३८.चक्रवाक ४०.मालदार ४१.नवसागर ४२.चरक ४४.मनन ४५.मन ४६.चमक ४८.मधोमध ५०.रोज ५२.भरीत ५३.कळप ५४.नरम ५६.महाभारत ५८.मर्द ५९.टीका ६२.रती ६३.गजानन ६५.पाताळयंत्री ६८.चाकवत ६९.देव ७०.काळजी ७२.कव ७३.पो ७४.गबाळ ७६.वरदान ७९.रडारड ८०.सुवास ८१.मीन ८२.नरवीर

उभे उत्तर : १.वटका २.वऱ्हाड ३.मसाप ३अ.सवड ४.परतपरत ५.भवन ६.वर ७.राक्षस ८.बरबाद ९.साप ११.परान्नभक्षण १२.परवानगी १४.पसारा १५.चोपडी १७.पट १९.खोट २१.बारदान २२.खटला २३.खेप २५.रसा २६.पोक २८.परकर ३०.संकलन ३१.तगर ३३.दशानन ३४.चक्र ३७.ससाणा ३८.चरचरीत ३९.धोपटी ५०.रोम ५१.लोहा ५२.भरती ५३.कर्दनकाळ ५५.रसाळ ५६.मनकवडा ५७.भारत ५८.मजा ६०.कांपा ६१.संत्री ६३.गवगवा ६४.नळ ६६.तावदान ६७.यंदा ६८.चाकर ७१.जीवन ७५.बास ७७.नर ७८.तार

## उपदेशकथा

### विचार

एक कोल्हा एका खोल तलावात पडला. त्यातून त्याला बाहेर निघता येईना. इतक्यात तिकडून एक तहानलेला बोकड आला. तलावात कोल्ह्याला पाहून त्याने विचारले, 'काय हो, आतलं पाणी चांगलं पिण्यासारखं आहे का?' ही आयतीच संधी पाहून कोल्ह्याने त्या पाण्याची खूप स्तुती केली. तहानलेल्या बोकडाने कसलाही विचार न करता आत उडी घेतली पोटभर पाणी प्यायल्यावर मात्र मग ते दोघे बाहेर कसं पडायचं याचा विचार करू लागले. कोल्हा एकदम म्हणाला, 'बघ एक चांगली कल्पना सुचलीय मला. तू मदत केलीस तर आपल्या दोघांचीही सुटका होईल. असं कर तू पुढचे पाय तलावाच्या भिंतीला लाव आणि शिंगे ताट करून उभा रहा. मी तुझ्या शिंगावरून उडी मारून वर जातो व तुलाही वर घेतो.

बोकडाने कोल्ह्याच्या सांगण्याप्रमाणे केले. कोल्हा शिंगावरून उडी मारून वर गेला आणि चालू लागला. बोकडाने तक्रार केल्याबरोबर थोडासा मागे वळून म्हणाला, मित्रा, तुझ्या या लांब दाढीपेक्षा तुझ्या डोक्यात थोडी अक्कल जास्त असती तर बरं झालं असतं. आत उडी मारण्यापूर्वी वर कसं यायचं याचा विचार केला होतास का?

कथा उपदेश : धोरणी माणसे अखेरपर्यंतचा सर्व विचार केल्याशिवाय कुठल्याही कामाला हात घालीत नाहीत.

## : SMS :

Meri biwi ne bola - "Tum khana banao to main bartaan dho dungi."
Maine Biryani bana di...
Ab 3 din se bartaan hi dho raha hu.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.० | २३.० |
| अहमदनगर | २९.६ | २२.३ |
| अकोला | ३१.८ | २४१ |
| अमरावती | ३०.९ | २३.८ |
| बीड | ३१.४ | २२.५ |
| भंडारा | ३२. | २४३ |
| बुलढाणा | ३१.२ | २३.५ |
| चंद्रपूर | ३१.२ | २४ |
| चेन्नई | ३३.१ | २६ |
| नवी दिल्ली | ३४ | २६.३ |
| धुळे | ३०.४ | २३२ |
| गोंदिया | ३०.८ | २४.८ |
| जळगाव | ३१.४ | २४ |
| कोल्हापूर | २७.८ | २२१ |
| लातूर | २९.६ | २३.२ |
| मुंबई | ३० | २६.८ |
| नागपूर | ३०५ | २४.२ |
| नांदेड | ३०.२ | २३.८ |
| नंदूरबार | ३० | २३.५ |
| नाशिक | २८.२ | २२.४ |
| पुणे | २८.५ | २२.८ |
| पंढरपूर | ३१.२ | २३. |
| सातारा | २८.२ | २१.८ |
| सांगली | २९.५ | २२.५ |
| सोलापूर | ३१.५ | २३.५ |
| वर्धा | ३१.२ | २५.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभेल. प्रवासाचे योग येतील. ताण–तणाव जाणवतील. थकवा जाणवेल.

**तूळ :** मुले मोठी असल्यास त्यांच्याशी मतभेदाची शक्यता आहे. गुंतवणुकीस दिवस चांगला आहे.

**वृषभ :** नातेवाईकांकडून फारशा अपेक्षा नकोत. मनोबल व आत्मविश्वास वाढेल. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. उमेद वाढेल.

**वृश्चिक :** वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. कर्मचारी, नोकरांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाची आर्थिक कामे होतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**मिथून :** कौटुंबिक जीवनात फारसे स्वास्थ्य लाभणार नाही. कुटुंबातील व्यक्तींच्या वागण्यामुळे मनाला वेदना होतील. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**धनू :** मित्रांचे विशेष सहकार्य लाभेल. वाहने सावकाश व काळजीपूर्वक चालवावीत. काही व्यक्तींबाबतीत राहत्या जागेचे प्रश्न उभे राहतील.

**कर्क :** आर्थिक लाभाच्या दृष्टीने दिवस चांगला आहे. उधारी–उसनवारी वसूल होईल. मात्र आर्थिक क्षेत्रात धाडस नको. वैवाहिक सौख्य लाभेल.

**मकर :** अनेकांशी सुसंवाद साधाल. कामाचा ताण जाणवेल. उधारी–उसनवारी वसूल होईल. प्रवासाचे योग येतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभेल.

**सिंह :** विवाहेच्छूंचे विवाह जमतील. प्रकृतीकडे लक्ष ठेवावयास हवे. खर्च वाढणार आहेत. नोकरी व्यवसायात सुस्थिती राहील. अनेकांशी सुसंवाद साधाल.

**कुंभ :** तुमची लोकप्रियता वाढेल. करार करण्यास दिवस चांगला आहे. नवीन हितसंबंध निर्माण करू शकाल. आर्थिक कामे सहजपणाने होणार आहेत.

**कन्या :** कलाकारांना व साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना सुसंधी लाभेल. आरोग्य उत्तम राहील. उत्साह वाढेल. महत्त्वाचे निर्णय नकोत.

**मीन :** उधारी उसनवारी वसूल करणेस हीच वेळ योग्य आहे. मनोबल व उत्साह वाढेल. मित्रांचे वागणे आपल्याला दु:ख देऊन जाईल. मनस्थिती द्विधा राहील.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:कृत्तिका |
| ३ सप्टेंबर २०२६ | २४:२९:०५+ |
| गुरुवार | योग:व्याघात १८:३२:२८ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि १५:२७:३७ |
| आषाढ शके | करण:बव २६:२५:४१+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:सिंह |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:वृषभ०७:२५:३४ |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– आषाढ | मुस्लिम मास – रबिलावल |
| ऋतु– सौर शरद | तारीख – २० |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:सप्तमी २६:२५:४१+ | बृहस्पती पूजन |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद; अक्षय कोठावळे मित्र परिवारातर्फे वही वाटप

**पुणे : दैनिक संध्या**

येरवडा येथील शासकीय बहुउद्देशीय संमिश्र दिव्यांग केंद्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांना अक्षय कोठावळे मित्र परिवारातर्फे वही वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची जाणीव ठेवत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली. दिव्यांग विद्यार्थी हे समाजाचा अविभाज्य घटक आहेत. त्यांच्या अडचणी आणि दुःख पूर्णपणे दूर करणे प्रत्येकासाठी शक्य नसले, तरी माणुसकीच्या नात्याने त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने योगदान देणे गरजेचे आहे. दिव्यांग बांधवांच्या आयुष्यातील सर्व प्रश्न आपण सोडवू शकत नाही; मात्र त्यांना आपलेपणाची जाणीव करून देत छोटीशी मदतही त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणू शकते. याच भावनेतून अक्षय कोठावळे मित्र परिवाराने दिव्यांग विद्यार्थ्यांना वहीचे वाटप करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला हातभार लावण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमातून सामाजिक संवेदनशीलता, परस्पर सहकार्य आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला. दिव्यांग बांधवांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समान संधी आणि सन्मान मिळवून देण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

### गणेशोत्सव मिरवणुकीमध्ये लेझर लाईटचा वापर करण्यास निर्बंध

**पुणे : दैनिक संध्या**

जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडाव्यात आणि कायदा व सुव्यवस्थेचा व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने १४ ते २५ सप्टेंबर पर्यंत अनंत चतुर्दशीचे गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये लेझर लाईटचा वापर करण्यास जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी निर्बंध लागू केले आहेत. या आदेशाचा भंग करून गणपती विसर्जनाचे मिरवणुकीमध्ये लेझर लाईटचा वापर करताना आढळून आल्यास अशा व्यक्ती, संस्था, मंडळे यांच्यावर भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ मधील तरतुदी व प्रचलित कायद्यान्वये शिक्षेस, कायदेशीर कारवाईस पात्र राहतील याची नोंद घ्यावी, असेही कळविण्यात आले आहे.

### ढोल-ताशा वादकांच्या हाती आता जीवनरक्षणाचे कौशल्य

**पुणे : दैनिक संध्या**



गणेशोत्सव, मिरवणुका आणि विविध सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये ढोल-ताशाच्या माध्यमातून संस्कृती व परंपरेचे जतन करणाऱ्या पथकांमध्ये तरुणांचा मोठा सहभाग असतो. वादनासोबतच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या तरुणांना आपत्कालीन परिस्थितीत एखाद्याचा जीव वाचविण्यासाठी आवश्यक असलेले जीवनरक्षक कौशल्य अवगत असणे उपयुक्त ठरणार आहे. अचानक हृदयक्रिया बंद पडणे, बेशुद्ध होणे किंवा अन्य वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत रुग्णालयापर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा वेळ निर्णायक ठरू शकतो. अशा वेळी तातडीने सीपीआर देता यावा आणि वैद्यकीय मदत मिळेपर्यंत रुग्णाचे प्राण वाचविण्यासाठी प्रयत्न करता यावेत, या उद्देशाने ढोल-ताशा महासंघ पुणे शहर आणि आदर फाउंडेशन यांच्या वतीने पथकातील वादकांसाठी सीपीआर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पर्वती पायथा येथील भारतमाता अभ्यासिका येथे हे शिबिर झाले. यावेळी मानाचा चौथा श्री तुळशीबाग गणपती मंडळाचे कोषाध्यक्ष नितीन पंडित, सेवा मित्र मंडळाचे शिरीष मोहिते, कुमार रेणुसे, प्रकाश राऊत आणि डॉ. स्वानंद पाटील, ढोल ताशा महासंघाचे शिरीष थिटे, ढोल ताशा महासंघ पुणे शहर कार्याध्यक्ष अभिजित कुमावत, उपाध्यक्ष अमर भालेराव, सचिव प्रशांत तांबे, आकाश जिंदम उपस्थित होते. या प्रशिक्षण शिबिरामध्ये पथकातील वादकांना सीपीआर प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले. अचानक हृदयक्रिया बंद पडणे किंवा व्यक्ती बेशुद्ध होणे अशा प्रसंगी तातडीने कोणती मदत करावी, सीपीआर कशा पद्धतीने द्यावा, तसेच वैद्यकीय मदत मिळेपर्यंत कोणती काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. सार्वजनिक उत्सवांमध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होत असल्याने अशा ठिकाणी प्रशिक्षित व्यक्ती उपलब्ध असणे महत्त्वाचे ठरते. या उद्देशाने वादकांना वादनासोबत जीवनरक्षणाचे कौशल्य आत्मसात करून देण्यात आले.

### नॅचरल्स एनएक्सटी कडून पुण्यात एआय पॉवर्ड ब्यूटी एक्सपिरियन्स सादर

**पुणे : दैनिक संध्या**



भारतातील सलूनच्या सर्वांत मोठ्या श्रृंखलांपैकी एक असलेल्या नॅचरल्सच्या नॅचरल्स एनएक्सटी या एआय तंत्रज्ञानावर आधारित सलून संकल्पनेचे अनावरण पुणे येथील अमनोरा मॉल येथे करण्यात आले..यासोबतच कंपनी तिच्या २५ वर्षांच्या प्रवासातील एक महत्त्वाचा नवीन अध्याय सुरू करत आहे. १,००० सलूनचा टप्पा गाठल्याचा आनंद साजरा करत असतानाच हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यातून दक्षिण भारतातून विस्तारलेल्या एका ब्युटी ब्रँडची खऱ्या अर्थाने 'राष्ट्रीय स्तरावरील ब्रँड' म्हणून विकसित होण्याची आणि अल्पावधीतच ४,५०० हून अधिक सलूनपर्यंत पोहोचण्याची महत्त्वाकांक्षा दिसून येते. नॅचरल्स एनएक्सटी सलून चे उद्घाटन नॅचरल्स सलूनचे सहसंस्थापक सीकेके यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी संजीव धिमान, सीईओ, नॅचरल्स, संध्या , अमनोरा मॉल , आणि गुंजन सीओओ, नॅचरल्स यांच्या सह अन्य मान्यवर हि उपस्थित होते नॅचरल्स समूहातील पहिले एआय-पॉवर्ड सलून म्हणून सादर होत असलेल्या नॅचरल्स एनएक्सटीमध्ये अधिक व्यक्तिगत आणि अखंड सौंदर्य अनुभव निर्माण करण्यासाठी तंत्रज्ञान आणि मानवी कौशल्याचा मिलाफ करण्यात आला आहे. कुशल व्यावसायिकांची जागा घेणाऱ्या तंत्रज्ञानाद्वारे नव्हे तर चांगले आणि अधिक व्यक्तिगत अनुभव देण्यासाठी त्यांना सक्षम बनविणाऱ्या तंत्रज्ञानातूनच सौंदर्याचे भविष्य आकारास येईल, या विश्वासाभोवती ही संकल्पना उभी करण्यात आली आहे. नॅचरल्स एनएक्सटीच्या माध्यमातून बुद्धिमान सल्ला-विमर्श आणि वैयक्तिकृत सौंदर्य शिफारसींपासून ते एक स्मार्ट आणि अधिक अखंड ग्राहक अनुभव तयार करण्यापर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही सलूनच्या प्रवासाचा भाग कसा बनू शकते, याचा शोध घेणे हे ब्रँडचे उद्दिष्ट आहे.

# श्रावण सहल अजिंक्यतारा किल्ल्यावर बहरली

■ पुणे (दै. संध्या)

सृष्टीतील चराचराला बहर येतो तो श्रावण महिन्यात आणि या बहारामुळेच कवी साहित्यिकांच्या लेखणीतून शब्दांच्या भावनांना नवचैतन्य मिळते. म्हणून साहित्य सम्राट पुणे हि संस्था अनेक वर्षापासून श्रावण महिन्यात निसर्ग सानिध्यात साहित्यिकांच्या गावाला भेट देत असते. श्रावण सहल उपक्रमाद्वारे निसर्ग आणि मराठी भाषेचे सौंदर्य शब्दातून फुलवण्याचे कार्य संस्था करत आहे. आज आपल्या मातृभाषेचे महत्व आपणच घरापासून टिकवण्याची गरज आहे. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांचा अजिंक्यतारा किल्ला तसेच श्री समर्थ रामदास स्वामींचा सज्जनगड अशा आध्यात्मिक आणि ऐतिहासिक प्रेरणादायी स्थळी सहल आयोजित केली आहे. जकातवाडी हे गाव आता कवितांचा गाव म्हणून प्रसिद्ध होत आहे. हे खूप महान आणि महत्त्वाचे कार्य येथील भाषाप्रेमी विचारवंतांनी हाती घेतले



आहे. असे मत संस्थेचे संस्थापकअध्यक्ष विनोद अष्टुळ यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. जगातील पहिले कवितांचे गाव येथे माझं कवितांचं गाव आणि साहित्य सम्राट पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने जकातवाडी राजधानी सातारा येथे २२९ वे कवी संमेलन आयोजित केले होते. मंचावर माझं कवितांचं गाव अध्यक्ष प्रल्हाद पारटे, उपाध्यक्ष विश्वास नेरकर, कार्याध्यक्षा सुषमा अलेकरी, जिल्हा अध्यक्ष राजेंद्र पाटील, सचिव प्रज्ञा रोकडे, प्र.पाहुणे शरदचंद्र काकडे, संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ आणि निवेदक जगदीप वनशिव उपस्थित होते. ऐतिहासिक अजिंक्यतारा किल्ल्याचा भक्कमपणा, सौंदर्य आणि शौर्य मनामध्ये साठवून कवीमनाचे साहित्यप्रेमी अध्यात्मिक विचारांच्या आणि थोरसंत समर्थ रामदास स्वामींच्या कर्तृत्वाने पावन झालेले सज्जनगडावर पोहोचले. त्यानंतर तनामनाने फुलून आलेली कवीमने जगातील पहिले कवितांचे गाव, माझं कवितांचं गाव या ठिकाणी मनातील कविता सादर करण्यासाठी प्रचंड उत्साहीत झाले. सुरुवातीला साहित्य सम्राटच्या पुण्याहून आलेल्या सर्व कवी कवयित्री या पाहुण्यांचे स्वागतगीताने स्वागत करण्यात आले. कवितांच्या गावात कवितांचे गाव होण्यासाठी कोणकोणते उपक्रम हाती घेऊन हे कवितांचे गाव साकार झालं याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष विश्वास नेरकर यांनी प्रस्तावनेत दिली.

या कवी संमेलनामध्ये सुप्रसिद्ध कवी कवयित्री आदरणीय प्रल्हाद शिंदे, बाबासाहेब केमकर, वैभव होले, अलका जोशी, सुरेश वाळेकर, भरत माने, विलास बाबर, किशोर कसबे, दत्तात्रय कुलकर्णी, दत्तू ठोकळे, आनंद गायकवाड, जगदीप वनशिव, विनोद अष्टुळ, संजीवनी जगताप, बाळकृष्ण अमृतकर, शरदचंद्र काकडे, अरुणा यादव, गोरक्षनाथ मोरे, सुनंदा अमृतकर, रेखा जगताप, सुरेखा भोसले, उज्वला कुलकर्णी, अशोक जाधव, वंदना ढोले, अनिता क्षीरसागर, जुई भोसले, शशिकला भोसले, सारंग जगताप, चित्रा सोनोने, लक्ष्मण शिंदे, राजेंद्र पाटील, प्रज्ञा रोकडे अशा अनेकांनी आपल्या बहारदार काव्यरचना सादर करून कवितांच्या गावात काव्य रसिकांची मने जिंकली.

जकातवाडी हे गाव कवितांचं गाव होईपर्यंत पायात चप्पल घालणार नाही. असे प्रतिज्ञा घेऊन कार्य करणारे संस्थेचे अध्यक्ष प्रल्हाद पारटे यांनी आपले मराठी काव्य संवर्धन कसे करावे याचे मार्गदर्शन आपल्या अभ्यासपूर्ण आभाराच्या भाषणातून उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा रोकडे आणि जगदीप वनशिव यांनी उत्स्फूर्तपणे पार पाडले.

## ३० हून अधिक देशांमधून सुमारे ५०० प्रदर्शक मुंबईत येणार

■ पर्यावरणीय पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक वाढली

■ तीन दिवसांच्या पर्यावरण तंत्रज्ञान व्यापार मेळाव्यात ६,००० हून अधिक उपाययोजनांचे प्रदर्शन

■ ५०० हून अधिक खरेदीदार-विक्रेता बैठका होणार

■ पुणे (दै. संध्या)

भारतात जलसुरक्षा, सांडपाणी प्रक्रिया, घनकचरा व्यवस्थापन आणि संसाधन पुनर्प्राप्ती या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर भारत आणि परदेशातील पर्यावरण तंत्रज्ञान कंपन्या, धोरणकर्ते, सरकारी व महानगरपालिका अधिकारी तसेच उद्योग क्षेत्रातील प्रमुख व्यक्ती आयफॅट इंडिया २०२६ मध्ये मुंबईत एकत्र येणार



आहेत. हा कार्यक्रम ९ ते ११ सप्टेंबर २०२६ दरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, मुंबई येथे आयोजित करण्यात येणार आहे. आगामी आयोजनाबाबत बोलताना भूपेंद्र सिंह, अध्यक्ष–आयएमईए (भारत, मध्य पूर्व आणि आफ्रिका), मेस्से म्युनिख इंडिया तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, मेस्से म्युनिख इंडिया, यांनी सांगितले की, “भारताचे पर्यावरणीय पायाभूत सुविधा क्षेत्र आता केवळ क्षमता वाढविण्याच्या टप्प्यापुढे जाऊन मोठ्या प्रमाणावर प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. शहरे आणि उद्योग अशी तंत्रज्ञाने शोधत आहेत, जी कार्यक्षमता वाढवतील, संसाधनांचा पुनर्वापर शक्य करतील आणि दीर्घकाळ विश्वासार्ह कामगिरी देतील.” मेस्से म्युनिख इंडिया यांच्या वतीने आयोजित आयफॅट इंडिया २०२६ हा जल, सांडपाणी, घनकचरा आणि पुनर्वापर तंत्रज्ञानासाठी भारतातील प्रमुख व्यापार मेळावा आहे. २०२६ च्या आयोजनात ३० हून अधिक देशांमधून सुमारे ५०० प्रदर्शक आणि २५,००० हून अधिक अभ्यागत सहभागी होण्याची अपेक्षा आहे. यामध्ये महानगरपालिका, सरकारी संस्था, ईपीसी कंपन्या, सार्वजनिक सेवा संस्था, उद्योग, सल्लागार, प्रकल्प विकासक आणि खरेदी विभागांचा समावेश असेल. यावर्षी आंतरराष्ट्रीय सहभागाला सहा देशांच्या पॅव्हेलियनद्वारे बळकटी मिळणार आहे.

## लेक्सस इंडिया ने लॉन्च केले ऑल-न्यू ईएस ३५०एच

■ पुणे (दै. संध्या)

लेक्सस इंडिया ने आज ऑल-न्यू ईएस ३५०एच लॉन्च केले, ज्यामध्ये नव्याने सादर केलेल्या आठव्या पिढीतील एक्झिक्युटिव्ह सेडानचा सेल्फ-चार्जिंग हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेरिएंट समाविष्ट आहे. या लॉन्चमुळे ब्रँडच्या इलेक्ट्रिफाइड पोर्टफोलिओमध्ये महत्त्वपूर्ण विस्तार झाला असून, लक्झरी ग्राहकांना हायब्रिड इलेक्ट्रिक वाहन पर्याय उपलब्ध करून दिला आहे, जो लेक्ससच्या कार्बन-न्यूट्रल भविष्यासाठीच्या मल्टी-पाथवे दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. ईएस हे 1989 मध्ये फ्लॅगशिप एलएस सोबत पदार्पणापासून लेक्ससचे एक महत्त्वाचे जागतिक मॉडेल राहिले आहे. अपवादात्मक शांतता, राईड कम्फर्ट आणि प्रशस्त इंटीरियरसाठी प्रसिद्ध असलेले ईएस आजपर्यंत जगभरातील 80 पेक्षा अधिक




देश आणि प्रदेशांमध्ये विकले गेले आहे. भारतातील लेक्सस लाइन-अपमधील हे मॉडेल एक महत्त्वाचा स्तंभ ठरले असून, ब्रँडची बाजारपेठेतील उपस्थिती घडविण्यात याने निर्णायक भूमिका बजावली आहे. ऑल-न्यू ईएस 350 एच भारतात निर्मित असून, त्या वारशावर आधारित आहे. हे ईएस 500ई सोबत आपले प्रगत प्लॅटफॉर्म आणि डिझाईन फिलॉसॉफी सामायिक करते आणि भारतीय बाजारपेठेबद्दल लेक्ससची दृढ बांधिलकी अधिक मजबूत करते.

## हायब इंडिया परतले हायब इंडिया ऑडिशन : फायनल कॉल, भारतभरातील शोधाचा विस्तार

■ पुणे (दै. संध्या)

हायब इंडिया ने आज हायब इंडिया ऑडिशन: फायनल कॉल ची घोषणा केली असून, पहिल्या फेरीतील ऑडिशनला मिळालेल्या जबरदस्त प्रतिसादानंतर पुढील पिढीतील भारतीय टॅलेंट शोधण्यासाठी हा उपक्रम विस्तारला जात आहे. हायब इंडिया ऑडिशनला आधीच भारतभरातून अर्ज आले आहेत, ज्यामध्ये 28 राज्ये आणि 6 केंद्रशासित प्रदेशांचा सहभाग आहे. तसेच जागतिक भारतीय डायस्पोराकडूनही मोठ्या प्रमाणात सहभाग मिळाला आहे. 116 देशांतील 1,650 हून अधिक शहरांमधून अर्ज प्राप्त झाले आहेत, ज्यातून हायब च्या जागतिक आर्टिस्ट डेव्हलपमेंट इकोसिस्टममध्ये सामील होण्याची संधी मिळवण्याची उत्सुकता आणि व्यापक रस दिसून येतो. फायनल कॉल हा हायब इंडिया चा विश्वास दर्शवतो की टॅलेंट कुठेही सापडू शकतो. आता हा शोध देशभरातील शहरांमध्ये, गावांमध्ये आणि समुदायांमध्ये




अधिक खोलवर जाईल, जिथे तरुण मुली मोठी स्वप्ने पाहत आहेत, आपला आवाज विकसित करत आहेत आणि स्वतःला व्यक्त करण्याचे नवे मार्ग शोधत आहेत. देशभरात ऑडिशनचा विस्तार करून हायब इंडिया अधिकाधिक कलाकारांना पाहिले जाण्याची, ऐकले जाण्याची आणि संधी मिळण्याची संधी देत आहे, ज्यामुळे त्यांना जागतिक मंचावर पहिले पाऊल टाकता येईल. हायब इंडिया ऑडिशन: फायनल कॉल साठी ऑनलाइन अर्ज 2 सप्टेंबर 2026 पासून सुरू होतील आणि अर्ज करण्याची अंतिम तारीख 31 ऑक्टोबर 2026 असेल.

## शशी थरूर यांच्या हस्ते प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचा सन्मान

नवी दिल्ली येथे ‘ग्लोबल व्हिजनरी एज्युकेशनिस्ट, देशभक्त आणि संवेदनशील नेतृत्व’ पुरस्कार प्रदान

■ पुणे (दै. संध्या)

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांना ‘ग्लोबल व्हिजनरी एज्युकेशनिस्ट, पेट्रियॉटिक अँड कम्पॅशनेट लीडर’ या प्रतिष्ठित सन्मानाने गौरविण्यात आले. नवी दिल्ली येथील आयआयटी दिल्लीच्या रिसर्च अँड इनोव्हेशन पार्कमधील सभागृहात नुकत्याच आयोजित ‘इंडिया@२०४७ लीडरशिप, इनोव्हेशन अँड ग्लोबल पॉवर समिट २०२६’ मध्ये खासदार आणि संयुक्त राष्ट्रसंघाचे माजी अंडर-सेक्रेटरी-जनरल डॉ. शशी थरूर यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. आजीवन, मूल्याधिष्ठित व सर्वांगीण शिक्षण, चारित्र्यनिर्मिती तसेच विद्यार्थी, माजी विद्यार्थी, कर्मचारी आणि समाजामध्ये देशभक्ती, संवेदनशीलता व शाश्वत मूल्यांची जोपासना करण्यासाठी त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण आणि



दीर्घकालीन योगदानाची दखल घेत हा गौरव करण्यात आला. ‘नेतृत्व, नवोन्मेष आणि जागतिक प्रभावाच्या माध्यमातून २०४७ च्या भारताचा प्रवास घडविणे’ या संकल्पनेवर आधारित या शिखर परिषदेत विविध क्षेत्रांतील निवडक मान्यवर नेते, नवोन्मेषक, उद्योजक, धोरणकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, गुंतवणूकदार आणि परिवर्तनाचे शिल्पकार सहभागी झाले होते. या परिषदेत दूरदृष्टीचे नेतृत्व, तंत्रज्ञान व नवोन्मेष, आर्थिक विकास, शिक्षण, जागतिक प्रभाव आणि आंतरराष्ट्रीय मुसद्देगिरी अशा विविध विषयांवर विचारमंथन करण्यात आले. तसेच शिक्षण, उद्योग, सामाजिक विकास आणि कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) या क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणारे मान्यवर नेते, शिक्षणतज्ज्ञ, नवोन्मेषक आणि सामाजिक प्रभाव निर्माण करणाऱ्या व्यक्तींचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुणे व प्रमुख वक्ते डॉ. शशी थरूर यांनी भारताच्या २०४७च्या वाटचालीवरील चर्चेला व्यापक दृष्टिकोन आणि महत्त्वपूर्ण विचारांची जोड दिली. मुत्सद्देगिरी, सार्वजनिक धोरण, आंतरराष्ट्रीय घडामोडी, साहित्य आणि प्रशासन क्षेत्रातील आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे डॉ. थरूर यांनी जागतिक पटलावरील भारताचे बदलते स्थान अधोरेखित केले. २०४७ पर्यंत भारताला जागतिक प्रभावशाली राष्ट्र म्हणून उदयास आणण्यासाठी आवश्यक असलेले नेतृत्व, विचारसरणी आणि संस्थात्मक क्षमता याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

# नागरिककेंद्रित विकासातून शाश्वत विकासाला गती द्या

## मुख्य सचिव राजेश अग्रवाल : ‘शाश्वत विकास उद्दिष्टे' दोन दिवसीय कार्यशाळाचा समारोप

■ पुणे (दै. संध्या)

शाश्वत विकास उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरिकांच्या मूलभूत गरजा केंद्रस्थानी ठेवून प्रशासनाने अधिक गतिमान, समन्वयपूर्ण आणि परिणामकारक पद्धतीने काम करावे. उपलब्ध निधी, मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांचा योग्य वापर करून शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी, वीज आणि कौशल्य विकासाला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले.

यशदा येथे आयोजित ‘शाश्वत विकास उद्दिष्टे (एसडीजी) व आकांक्षी जिल्हे, तालुका कार्यक्रम’ कार्यशाळेच्या समारोपीय सत्रात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे, उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य



कार्यकारी अधिकारी आणि तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

मुख्य सचिव अग्रवाल म्हणाले, नागरिकांच्या मूलभूत गरजांसोबतच वीज, पाणी, रस्ते, सार्वजनिक वाहतूक, मोबाईल कनेक्टिव्हिटी, बँकिंग, शिक्षण आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे. विविध विभागांनी एकत्रित नियोजन केल्यास उपलब्ध निधी आणि मनुष्यबळाचा अधिक परिणामकारक वापर करता येईल.

विद्यार्थ्यांची नावनोंदणी, उपस्थिती आणि शैक्षणिक प्रगतीची माहिती वस्तुनिष्ठ पद्धतीने नोंदविल्यास त्याआधारे शाळांसाठी आवश्यक सुविधा, शिक्षक आणि निधीचे योग्य नियोजन करता येईल. प्रत्येक मूल शिक्षणाच्या प्रवाहात राहील यासाठी स्थानिक प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

‘शासन आपल्या दारी’ संकल्पनेचा उल्लेख करताना जिल्हा परिषद योजनांमध्येही नागरिकांच्या गरजेनुसार सेवा थेट त्यांच्यापर्यंत पोहोचविणाऱ्या अभिनव उपक्रमांचा विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. शाळांमध्ये कौशल्याधारित व व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ग्रामीण रस्त्यांसाठी उपलब्ध निधीचा प्रभावी वापर, जिल्हा वार्षिक योजनांचे सुलभीकरण, तसेच अंगणवाडी, शाळा आणि आरोग्य केंद्रांच्या दुरुस्तीला प्राधान्य देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांच्या सेवा ऑनलाइन करून त्या अधिक गतिमान करण्यावर भर देण्यात येत असल्याचे श्री. अग्रवाल म्हणाले.

विभागीय समन्वय, अधिकारांचे विकेंद्रीकरण, डिजिटल सेवा आणि उपलब्ध संसाधनांचा परिणामकारक वापर यांच्या माध्यमातून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देत राज्याच्या शाश्वत विकासाला गती देण्याचा निर्धार या कार्यशाळेत व्यक्त करण्यात आला.

यशदा येथे आयोजित कार्यशाळेत शाश्वत विकास उद्दिष्टे (एसडीजी) आणि आकांक्षी जिल्हे व तालुका कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी एसडीजीबाबत, तर अर्थ व सांख्यिकी आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पाडियार यांनी राष्ट्रीय निर्देशक आराखड्याबाबत माहिती दिली. डॉ. परदेशी आणि ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी १० आकांक्षी जिल्हे व १७७ आकांक्षी तालुक्यांवर सादरीकरण केले. आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी, सामाजिक विकास आणि पायाभूत सुविधांवर अनुक्रमे डॉ. निपुण विनायक, श्री. संजय काटकर, डॉ. अनुपकुमार यादव, श्री. रणजितसिंह दीओल, श्री. परिमल सिंह, श्री. विजय वाघमारे आणि डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी मार्गदर्शन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



## दीप्ती चवधरी यांच्या कार्यअहवालाचे राहुल गांधी यांच्या हस्ते शिबीरामध्ये प्रकाशन

**नाशिक : दैनिक संध्या**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस पक्षाचे युवा नेते मा. खा. राहुल गांधी यांनी नाशिक येथे महाराष्ट्रातील काँग्रेस अध्यक्षांच्या शिबीरात येऊन मार्गदर्शन केले. तसेच सर्व अध्यक्षांच्या कुटूंबीयांना देखील भेटले व आस्थेने विचारपूस केली. याप्रसंगी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी यांनी तयार केलेल्या त्यांच्या पहिल्या १०० दिवसांच्या कामाचा अहवाल मा. खा. राहुल गांधी यांनी प्रकाशित केला आणि काँग्रेस पक्षाचे कार्य असेच जोमाने चालू ठेवा अशा शुभेच्छा दिल्या. दीप्ती चवधरी यांना पश्चिम विभागाच्या अध्यक्ष पदाचे नेमणुक पत्र मिळाल्यानंतर त्यांनी पदभार स्विकारला व त्या नंतरच्या १०० दिवसांचा कार्यअहवाल तयार केला याचे प्रकाशन मा. खा. राहुल गांधी यांच्या हस्ते झाले. यामुळे माझा उत्साह वाढला असून अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मला मिळाली असे दीप्ती चवधरी या निमित्त म्हणाल्या. या प्रसंगी त्यांचे कुटूंबिय अंकुर चवधरी व हिना चवधरी हे उपस्थित होते.

## १३ सप्टेंबरला सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचा ८०६ वा अवतार दिन महोत्सव

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

अखिल भारतीय महानुभाव परिषद अंतर्गत पुणे जिल्हा महानुभाव परिषदेच्या वतीने सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा ८०६ वा अवतार दिन महोत्सव रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी करंदी-पऱ्हाडवाडी येथील मयुरी लॉन्स मंगल कार्यालय, पिंपळे जगताप येथे विविध धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. परब्रम्ह प्रतिष्ठान महानुभाव, पुणे तथा श्रीपंचकृष्ण प्रतिष्ठान पदयात्रा, करंदी-पऱ्हाडवाडी यांच्या वतीने या महोत्सवाचे विशेष नियोजन करण्यात आले आहे. महानुभाव पंथाची अध्यात्मिक परंपरा, संत विचार आणि सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या मानवतावादी शिकवणीचा जागर या महोत्सवाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. महोत्सवाच्या निमित्ताने मंगल अभिषेक, पारायण, भव्य मिरवणूक, ध्वजारोहण, सत्कार समारंभ, धर्मसभा, महाआरती तसेच महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे परिसरात भक्तिमय आणि अध्यात्मिक वातावरण निर्माण होणार आहे. या सोहळ्यास आचार्यप्रवर महंत हंजराजबाबाजी खामनीकर यांच्यासह पुणे जिल्हा महानुभाव परिषदेचे पदाधिकारी, आचार्यगण, साधू-संत, तपस्विनी, नामधारक, सद्भक्त तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या पवित्र अवतार दिन महोत्सवाचा भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कौटुंबिक वादातून पत्नीचा खून करणाऱ्या आरोपी पतीची आत्महत्या

**राजगुरुनगर : दैनिक संध्या**

राजगुरुनगर येथे कौटुंबिक वादातून पत्नीचा गळा आवळून खून करीत फरार झालेल्या माजी सैनिक असलेल्या पतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. महेंद्र शिवाजी दौंडकर वय ४५, रा. संगम गार्डन वाडा रोड, राजगुरुनगर) असे आत्महत्या केलेल्या पतीचे नाव आहे. याबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी दि.३० रोजी रात्री संगम गार्डन राजगुरुनगर येथे राहणाऱ्या माजी सैनिक महेंद्र शिवाजी दौंडकर याने त्यांची दीपा महेंद्र दौंडकर हिचा गळा आवळून खून केला होता.ही घटना पाहणाऱ्या त्याच्या १७ वर्षीय अथर्व या मुलावर चाकूहल्ला करून त्याच्या खुनाचा प्रयत्न केला होता.त्यानंतर राहत्या घरातून महेंद्र फरार झाला होता.मुलगा अथर्व याने खेड पोलिसांत वडील महेंद्र शिवाजी दौंडकर याच्या विरोधात फिर्याद दिली होती. पोलिसांकडून त्याचा शोध सुरु होता. बुधवारी (दि.२) सकाळी चांडोली गावच्या हद्दीत भीमा नदी किनाऱ्यावरील एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत मिळून आला. घटनास्थळाचा पंचनामा पोलिसांनी करून मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी चांडोली ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. या गुन्हाचा अधिक तपास पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण करीत आहेत.



## मोरया पुरस्कारात आळंदीच्या जय गणेश प्रतिष्ठानला द्वितीय क्रमांक

**आळंदी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित 'मोरया पुरस्कार-२०२५' स्पर्धेत परिमंडळ-३ स्तरावर आळंदी येथील जय गणेश प्रतिष्ठानला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. मंडळाच्या वतीने यंदा सादर करण्यात आलेला 'श्री महालक्ष्मी (अंबाबाई) मंदिर' हा आकर्षक देखावा, तसेच गणेशोत्सव काळात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, माजी नगरसेवक प्रकाश कुऱ्हाडे व उद्योजक चेतन कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष सागर उर्फ गोविंद कुऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने गणेशोत्सवाचे आयोजन केले होते. देखावा पाहण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी प्रवेश व बाहेर जाण्यास स्वतंत्र मार्गांची व्यवस्था करण्यात आली होती. दिशादर्शक फलक, सीसीटीव्ही यंत्रणा तसेच वाहतुकीला अडथळा होणार नाही, अशा पद्धतीने गणेशमूर्तीची स्थापना करण्यात आली होती. मंडळाच्या वतीने गरीब व बेवारस व्यक्तींच्या अंत्यविधीसाठी आर्थिक मदत केली जाते. तसेच देखावा पाहण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. गणेश विसर्जन मिरवणुकीत 'घराचे घरपण हरवलं' या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. गुलालमुक्त व शिस्तबद्ध पद्धतीने प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करत विसर्जन मिरवणूक पार पडली. पुरस्कार जय गणेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा नगरसेवक सागर उर्फ गोविंद कुऱ्हाडे व मंडळाच्या सर्व सभासदांनी स्वीकारला. यावेळी पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, आळंदी पोलिस ठाण्याचे भीमाजी नरके, मच्छिंद्र शेंडे, परीक्षक अजित वडगावकर आदी उपस्थित होते.

# ध्वनीची मर्यादा पाळू; पण बंदी घालून उपासमारीची वेळ आणू नका

### पुणे जिल्हा साऊंड, लाईट, जनरेटर ओनर्स असोसिएशनची मागणी; सर्व सण-उत्सवांसाठी वर्षभर एकच नियम लागू करा

■ **पुणे (दै. संध्या)**

दहीहंडी, गणेशोत्सव आणि डीजे हा विषय सध्या तापलेला आहे. अशातच 'आम्ही प्रशासनाने घातलेले सगळे नियम पाळायला तयार आहोत; पण साउंड सिस्टीमवर बंदी घालून किंवा निर्बंध लादून आमच्यावर उपासमारीची वेळ आणू नका', असे आवाहन पुणे जिल्हा साऊंड, लाईट, जनरेटर ओनर्स असोसिएशनने केले आहे. नवी पेठेतील पत्रकार भवन येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत असोसिएशनचे अध्यक्ष गणेश काळभोर, उपाध्यक्ष सागर सुतार, कार्याध्यक्ष ओंकार पडवळ, सल्लागार मोहित पालेशा आणि रिपब्लिकन परिवर्तन पँथरचे गजेंद्र प्रकाश मोरे उपस्थित होते.



साऊंड सिस्टीमवर पूर्णपणे बंदी न घालता शासनाने निश्चित केलेल्या ध्वनीमर्यादा, वेळेचे नियम व न्यायालयीन मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करुन गणेशोत्सव साजरा करण्यास परवानगी द्यावी, तसेच एक नियमावली तयार करून ती वर्षभर सर्व सण, उत्सव, कार्यक्रमासाठी लागू करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. आम्ही यावर्षी अशाच मंडळांकडून बुकिंग घेतले आहे, ज्यांनी आवाज वाढवायला सांगणार नाही, असे लेखी दिले आहे. मात्र दहीहंडीपर्यंत आमच्याविरोधात जाणारे नियम लागू केले, तर मात्र आम्हाला महाराष्ट्रभरातून मोर्चा काढावा लागेल, असा इशाराही असोसिएशनच्या वतीने देण्यात आला. गणेश काळभोर म्हणाले, "प्लास्मा, साऊंडच्या भिंती, दोन मंडळांमध्ये समोरासमोर आल्यावर होणारी स्पर्धा यांमुळे गणेशोत्सव दरम्यान डीजेचा आवाज प्रमाणाबाहेर वाढतो. याचा सामान्य नागरिक, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्णांना त्रास होतो हे आम्हालाही मान्य आहे. त्यासाठी आम्ही न्यायालयाच्या नियमांमध्ये साऊंड सिस्टिम चालवणार आहोत. मात्र उत्सवादरम्यान साऊंड पूर्णपणे बंद करणे हा आमच्या व्यवसायिकांवर अन्याय आहे. या व्यवसायावर आधारित उपजीविका असणारे हजारो लोक पुण्यात आहेत, त्या सगळ्यांची कुटुंबे त्यांच्यावर अवलंबून आहेत. व्यावसायिकांचा दरवर्षी २० ते २५ लाखांचा आर्थिक व्यवहार होत होता. परंतु यंदा २५-५० हजार रुपये मिळणेही अवघड झाले आहे.

"दहीहंडी, गणेशोत्सव हाच वर्षभरातील आमचा मुख्य व्यवसायाचा कालावधी असतो. साऊंड सिस्टिमसाठी केवळ चार टॉप आणि चार बेस हा निर्णय आम्हाला मान्य आहे. लेझर लाईट, प्रेशर मेडला घातलेली बंदी, आम्हाला मान्य आहे. कर्णकर्कश्श आवाज बंद करण्यासही आमचे समर्थन आहे. उत्सव हा सगळ्यांचा असून मिरवणुकीतील साउंड सिस्टिमवरील बंदी आणि निर्बंधांबाबत प्रशासनाने पुनर्विचार करावा अशी मागणी आम्ही करतो. अशाप्रकारे व्यावसायिकांची गळचेपी केल्यास साऊंड आणि डीजेच्या समर्थनासाठी पुण्यात गणेश मंडळ कार्यकर्त्यांना सोबत घेऊन मोर्चा काढला जाईल," असे गजेंद्र मोरे म्हणाले.

> सागर सुतार म्हणाले, "साऊंडचा व्यवसाय हा आम्ही जोडधंदा म्हणून करतो. पण अशाप्रकारे आमचा रोजगार हिरावून घेतला जात आहे. आपल्या राज्यातील साउंड सिस्टिमला कमी मागणी असून इतर राज्यातील साउंड सिस्टिमची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे स्थानिक रोजगारावर विपरीत परिणाम होत आहे. गणेश मंडळांनी महाराष्ट्र सोडून इतर राज्यातून साऊंड सिस्टिम मागवू नये, अशी आमची विनंती आहे. यंदा मिरवणुकीत अश्लील गाणी न वाजवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. डिजे बंदीमुळे प्रशासन दरवर्षी नियमात बदल करते आणि आम्हाला आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. त्यामुळे एकदाच याबाबत प्रशासनाने नियमावली करावी."

## आणे येथील ३८ वर्षीय तरुण बेपत्ता; शोधमोहीम सुरू

■ **नारायणगाव (दै. संध्या)**

आणे येथील संदीप सुदाम शिंदे (वय ३८) हा तरुण संशयास्पदरीत्या बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून आळेफाटा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा तरुण ३१ ऑगस्ट रोजी दुपारपासून बेपत्ता झाला आहे. तो नारायणगाव येथे टोमॅटो पट्टीचे पैसे आणण्यासाठी जात असल्याचे सांगून घरातून मोटारसायकलवरून निघाला होता. मात्र, त्यानंतर तो घरी परतला नाही. दरम्यान, त्याची मोटारसायकल बोरी बुद्रुक गावच्या हद्दीत आळे-बोरी रस्त्यावरील कालव्याच्या पुलाजवळ आढळून आली. दरम्यान, संदिपचे वडील सुदाम कारभारी शिंदे यांनी १ सप्टेंबर रोजी आळेफाटा पोलिस ठाण्यात मिसिंगबाबत खबर दिली आहे. त्यांच्या माहितीनुसार,३१ ऑगस्ट रोजी दुपारी एकच्या सुमारास संदिप घरातून होंडा शाईन मोटारसायकल (एमएच १४ जीके १९६७) घेऊन नारायणगावला जात असल्याचे सांगून निघाला. सायंकाळी पाचच्या सुमारास वडिलांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधला असता, 'मी सध्या आळेफाटा येथे आहे,' असे त्याने सांगितले.

## ऊर्जा विभागाच्या दालनाला सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण स्टॉलचा पुरस्कार

■ **मुंबई (दै. संध्या)**

नवी दिल्ली येथील 'भारत इलेक्ट्रिसिटी, पॉवरजेन इंडिया आणि इंडियन युटिलिटी वीक २०२६' या जागतिक परिषदेच्या ऊर्जा प्रदर्शनीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाच्या दालनाला सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण स्टॉल डिझाइनच्या पुरस्काराने बुधवारी (दि. २) गौरविण्यात आले. केंद्रीय विद्युत आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.





नवी दिल्ली येथील यशोभूमिमध्ये येथे १ ते ३ सप्टेंबरपर्यंत आयोजित 'भारत इलेक्ट्रिसिटी, पॉवरजेन इंडिया आणि इंडियन युटिलिटी वीक २०२६' परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्य 'फोकस स्टेट' म्हणून सहभागी झाले आहे. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आणि ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या नेतृत्वात राज्याने ऊर्जा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे सादरीकरण या परिषदेतील लक्षवेधक प्रदर्शनीच्या माध्यमातून करण्यात येत आहे व त्यास मोठा प्रतिसाद मिळत आहे.


महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, महाऊर्जाचे महासंचालक श्री. ओमप्रकाश बकोरिया, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राधाकृष्णन बी., महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विक्रम कुमार यांच्या मार्गदर्शनात चारही संस्थांचे संयुक्त प्रदर्शनी दालन या परिषदेत उभारण्यात आले आहे. महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक गडकिल्ल्यांची ओळख तसेच हरित ऊर्जेतील प्रवासाचा संगम साधून या दालनाची रचना करण्यात आली आहे.

## शिरूरमधील ७४३.५७ हेक्टर शेतजमिनीच्या भूसंपादनाला स्थगिती

■ **नारायणगाव (दै. संध्या)**

शिरूर तालुक्यातील पाबळ,खैरेनगर आणि धामारी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित करण्याच्या प्रस्तावित प्रक्रियेला तसेच ७/१२ उताऱ्यावर अधिसूचित क्षेत्र असा शेरा नोंदविण्याच्या कारवाईला तात्काळ स्थगिती देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी घेतला आहे.

या विषयासंदर्भात मंत्रालय, मुंबई येथे मा.मंत्री मेघनाताई बोर्डीकर तसेच पाबळ, धुमारी आणि खैरेनगर येथील बाधित ग्रामस्थांच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या अडचणी व तीव्र भावना त्यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी पुढाकार घेतला. या परिसरातील एकूण ७४३.५७५५ हेक्टर क्षेत्र प्रस्तावित औद्योगिक प्रक्रियेत येत असून त्यापैकी ७११.५३९० हेक्टर खासगी आणि ३२.०३६५ हेक्टर सरकारी जमीन आहे. ७/१२ उताऱ्यावर 'अधिसूचित क्षेत्र' अथवा भूसंपादनाचा शेरा नोंदवल्यास शेतकऱ्यांना पीक कर्ज,शेती कर्ज व इतर आर्थिक सुविधा मिळण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती.तसेच जमिनीचे हस्तांतरण, गहाण ठेवणे आणि मुलांचे शिक्षण,लग्नकार्य व वैद्यकीय गरजांसाठी निधी उभारण्यावरही गंभीर परिणाम झाला असता. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण व्हावे आणि कोणताही निर्णय घेताना स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जावे, ही भूमिका मुख्यमंत्री महोदयांसमोर ठामपणे मांडण्यात आली. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी या मागणीची तातडीने दखल घेत ७/१२ उताऱ्यावर तसेच फेरफार पत्रावर 'अधिसूचित क्षेत्र' किंवा भूसंपादनाचा शेरा नोंदविण्याच्या कारवाईला स्थगिती देण्याचा सकारात्मक निर्णय घेतला. या निर्णयामुळे पाबळ, खैरेनगर आणि धामारी येथील शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.



## Gen-Z च्या भविष्यासाठी कक्कया समाजाचा निर्धार

■ **मुंबई (दै. संध्या)**

समाजातील Gen-Z तरुणांची एकजूट निर्माण करून त्यांना करिअर व विचारांना चालना देण्यासाठी संत कक्कया विकास संस्था, धारावीच्या वतीने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून येत्या रविवार दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्री गणेश विद्या मंदिर, धारावी येथे कक्कया युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील विविध क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी व सुशिक्षित बेरोजगार तरुणांना एकत्र आणून योग्य मार्गदर्शन करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून यामध्ये NEET, MPSC, UPSC, पोलीस भरती, लेखा परीक्षण, IAS, IPS, परदेशात शिक्षणासाठी शासकीय प्रवेश, इंजिनिअरिंग क्षेत्रातील खासगी कंपन्यांमधील नोकरीच्या संधी, व्यवसायासाठी शासकीय कर्ज व बँकिंग स्पर्धा परीक्षा, तसेच फिल्म, म्युझिक, नाटक, गायन, डान्स, बॉलिवूड आणि क्रीडा क्षेत्रातील करिअरसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाणार आहे. पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलांची भविष्यासाठी नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले असून या कार्यक्रमात कक्कया समाजातील Gen-Z तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या मनातील भावना व्यक्त कराव्यात असे आवाहन कक्कया सामाजिक कार्यकर्ता मंचने केले आहे.

## विद्यार्थ्यांना वाहतूक सुरक्षेचे धडे

■ **हवेली (दै. संध्या)**

विद्यार्थी दशेपासूनच वाहतूक सुरक्षा बाबत जागृती झाल्यास भविष्यात रस्त्यावरील होणारे अपघात टाळता येतील या उद्देशाने पुणे शहर वाहतूक शाखा, आरएसपी विभाग यांच्या वतीने पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव तालुका हवेली येथे बुधवार दिनांक २/९/२०२६ रोजी वाहतूक सुरक्षा व विद्यार्थी सुरक्षा संदर्भात नियमांचे मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण नवघणे सहाय्यक पोलीस फौजदार विनोद लवांडे पोलीस हवालदार बाबू गदादे (सर्व पुणे शहर वाहतूक शाखा आरएसपी विभाग) दिलीप ताम्हाणे निवृत्त माजी सैनिक संघटना संचालक यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः वाहतुकीचे नियम पाळावेत तसेच आपले शिक्षक आपले आई-वडील नातेवाईक यांनाही वाहतुकीच्या नियमावर मार्गदर्शन करावे असे सांगितले रस्त्यावरील दिव्यांचा अर्थ समजून घ्यावा तसेच रस्त्यावर वेगवेगळे पांढरे, पिवळे पट्टे मारलेले असतात, त्याचाही अर्थ जाणून घेऊन रस्ता ओलांडताना किंवा रस्त्यावरून वाहन चालवताना सर्व नियमांचे जर काटेकोरपणे पालन केले, तर रस्ते अपघात कमी होतील. आणि मानवी सुरक्षा अधिक चांगली होईल. यासाठी आपण विद्यार्थीदशेपासूनच सुरुवात करावी असे सांगितले. तसेच आपल्याला विद्यालयात घेऊन येणाऱ्या बस व त्या बसमध्ये असणारी सुरक्षेची साधने याविषयी जागरूक असावे. बसमध्ये उतरताना किंवा चढताना गर्दी करू नये ओळीने उतरावे व चढावे यामुळे इजा होण्याची शक्यता कमी असते. दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट वापरावे, चारचाकी वाहन चालवताना सीटबेल्ट लावणे, रस्त्याच्या बाजूने चालताना पादचारी मार्गाचा वापर करावा व नेहमी उजव्या बाजूने चालावे. रस्ता ओलांडताना झेब्रा क्रॉसिंगवरुनच रस्ता ओलांडावा. तसेच मुलांनी १८ वर्षे पूर्ण झालेनंतरच दुचाकी किंवा चारचाकी वाहन चालवावे अशा सूचना दिल्या.याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी सर्व अधिका-यांचे स्वागत केले.तर विद्यालयाचे शिक्षक दिलीप थोपटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन विठ्ठल ठोंबरे यांनी मानले.या उपक्रमात सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते.



## खो-खो चॅम्पियनशिपमुळे भारतातील खो-खो क्रांतीला बळ

■ **पुरी (दै. संध्या)**

ओडिशा AM/NS इंडिया खो-खो हाय परफॉर्मन्स सेंटरच्या पुढाकाराने, ओडिशा सरकारच्या क्रीडा व युवक सेवा विभाग (DSYS), खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया (KKFI) आणि ओडिशा खो-खो असोसिएशन (OKKA) यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेली ओडिशा AM/NS इंडिया ज्युनिअर खो-खो चॅम्पियनशिप २०२६ उत्साहात पार पडली. २९ ते ३१ ऑगस्टदरम्यान झालेल्या या तीन दिवसीय स्पर्धेत देशभरातील १२ संघांमधील सुमारे १८० युवा खेळाडूंनी सहभाग घेत वेग, कौशल्य, शिस्त आणि संघभावनेचे प्रभावी दर्शन घडविले. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून २९ ऑगस्ट रोजी स्पर्धेचे उद्‌घाटन झाले. यावेळी KKFIचे अध्यक्ष सुधांशु मित्तल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. KKFIचे उपाध्यक्ष तथा OKKAचे सचिव प्रद्युम्न मिश्रा, आंध्र प्रदेश खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष एम.व्ही.एस.एस. प्रसाद आणि AM/NS इंडियाचे CSR प्रमुख डॉ. विकास यादवेंदू यांचीही प्रमुख उपस्थिती होती. ज्युनिअर मुलींच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने यजमान ओडिशाचा २४-२० असा चार गुणांनी पराभव करत विजेतेपदावर नाव कोरले. कांस्यपदकाच्या लढतीत पंजाबने तमिळनाडूवर मात केली.ओडिशाची तुलसी नाईक हिला स्पर्धेतील 'बेस्ट अटॅकर', तर महाराष्ट्राची मैथिली पवार हिला 'बेस्ट डिफेंडर' पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्राच्या






स्नेहा लामकाने हिने संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी करत 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्कार मिळवला. ज्युनिअर मुलांच्या अंतिम सामन्यात कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्यात अत्यंत चुरशीची लढत झाली. अखेर कर्नाटकने महाराष्ट्राचा अवघ्या दोन गुणांनी ३६-३४ असा पराभव करत विजेतेपद पटकावले. सामन्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या लढतीने उपस्थित प्रेक्षकांची उत्कंठा वाढवली होती. कांस्यपदकाच्या सामन्यात ओडिशाने कोल्हापूरचा पराभव करत तिसरे स्थान मिळवले. कर्नाटकच्या इब्राहिम याला 'बेस्ट अटॅकर', तर महाराष्ट्राच्या पार्थ देवकाते याला 'बेस्ट डिफेंडर' पुरस्कार मिळाला. कर्नाटकच्या अनिकेत याला संपूर्ण स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' म्हणून गौरविण्यात आले. खेळाडूंचे अभिनंदन करताना AM/NS इंडियाचे HR आणि ॲडमिनिस्ट्रेशन विभागाचे संचालक व उपाध्यक्ष आशुतोष तेलंग म्हणाले, "या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व संघांचे आणि उत्कृष्ट कौशल्य व जिद्द दाखवणाऱ्या विजेत्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. योग्य प्रशिक्षण आणि स्पर्धात्मक संधी उपलब्ध करून दिल्यास खो-खो भारतातील लोकप्रिय खेळांपैकी एक बनू शकतो, हे या स्पर्धेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे." देशभरातील सर्वोत्तम संघांना एकाच व्यासपीठावर आणून युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम AM/NS इंडिया करत असल्याचे त्यांनी सांगितले. खो-खोसाठी मजबूत आणि पोषक वातावरण निर्माण करण्याबरोबरच पुढील आवृत्ती आणखी मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्याची कटिबद्धताही त्यांनी व्यक्त केली. ३१ ऑगस्ट रोजी झालेल्या समारोप सोहळ्याला श्री जगन्नाथ संस्कृत विद्यापीठ, पुरीचे कुलगुरू प्रा. प्रभात कुमार मोहपात्रा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ऑलिम्पियन व अर्जुन पुरस्कार विजेते के. रवी कुमार, बीजू पटनाईक स्पोर्ट्स पुरस्कार विजेत्या व पॅरा-ॲथलीट सुचित्रा परिडा, KKFIचे उपाध्यक्ष व सचिव प्रद्युम्न मिश्रा, AM/NS इंडियाचे CSR प्रमुख विकास यादवेंदू, पुरीचे जिल्हा क्रीडा अधिकारी चंदन कुमार साहू आणि जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी संतोष कुमार सेठी यांच्यासह प्रशिक्षक, अधिकारी आणि खेळाडू उपस्थित होते.



## थोडक्यात पण महत्वाचे



### भटके विमुक्त दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ७५ वा भटके-विमुक्त दिवस रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर, परिसंवाद, ढोल ताशांचा गजर आणि प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या माध्यमातून भटके विमुक्त घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक प्रगतीसाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. विमुक्त जात समूहाला ब्रिटिश राजवटीत १८७१ सालापासून गुन्हेगार जमात संबोधून तारेच्या कुंपणात बंदिस्त करण्यात आले होते. भारतीय स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी भारत सरकारने या घटकांना कुंपणाच्या जोखडातून मुक्त केले. या स्वातंत्र्याचा जागर भटके विमुक्त दिनी कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आला. बंदिस्त तारेच्या कुंपणात जन्म झालेले आणि सध्या १०३ वर्षे वय असलेल्या समर्थ सद्गुरू शिवलाल स्वामी महाराज सोलापूरकर यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमास होती. महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या अधिपत्याखाली भाटनगर पिंपरी येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास 'ब' प्रभाग अध्यक्ष मंदार देशपांडे, माजी महापौर कविचंद भाट, नगरसदस्य डब्बू आसवानी, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त गोरख लिमन, कामगार नेते तथा भाट समाज सेवा ट्रस्टचे शहर अध्यक्ष मनोज माछरे, माजी जनसंपर्क अधिकारी रमेश भोसले, भटक्या-विमुक्त जाती-जमाती सामाजिक आधार संघटनेचे अध्यक्ष हरिभाऊ सावंत, ललित कासार, पुणे महापालिकेचे माजी नगरसेवक सुनील मलके, निवृत्त सहायक आयुक्त सुभाष माछरे, तसेच सामाजिक कार्यकर्ते नेताजी शिंदे, अक्षय माछरे, विक्की तामचीकर, भूपेंद्र तामचीकर, अभय भाट, रामचंद्र भाट, संजू घमंडे, सुभाष माछरे, विशाल भाट, धीरज तामचीकर, नरेंद्र तामचीकर, ॲड. वर्षा तामचीकर, वनिता अभंगे, डॉ. स्नेहा माछरे, नम्रता भाट, शीतल भाट, ॲड. अजय नवले, रामभाऊ बाटुंगे, जतन बार्डे, मनोहर अबवेकर, कुलदीप तमायची आदी उपस्थित होते. भटक्या-विमुक्त समाजाची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती तसेच समाजाची दशा आणि विकासाची दिशा या विषयावर आयोजित परिसंवादात वक्त्यांनी मार्गदर्शन केले. भटका विमुक्त समाज आजदेखील हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहे. गुन्हेगार जमातीचा शिक्का पुसून प्रगत जीवनाचा मार्ग अनुसरण्यासाठी फुले शाहू आंबेडकरी विचारधारा अंगीकारणे आवश्यक आहे. शिक्षण हा प्रगतीचा एकमेव मार्ग असून शिक्षित समाज उन्नती करू शकतो असे विचार परिसंवादातून व्यक्त करण्यात आले.

### वीज जोडणीच्या कामामुळे ३ सप्टेंबरला पाणीपुरवठा बंद

**पिंपरी चिंचवड : दैनिक संध्या**

चिखली जलशुद्धीकरण केंद्र येथे २०० दशलक्ष लिटर प्रतिदिन (द.ल.ली.) क्षमतेच्या नवीन प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पासाठी उच्चदाब वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी उच्चदाब केबल वीजप्रणालीत जोडणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या कामासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने उच्चदाब वीजपुरवठा पूर्णपणे बंद ठेवावा लागणार असल्याने चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत उच्चदाब वीजपुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे या कालावधीत चिखली जलशुद्धीकरण केंद्रावरून पाणीपुरवठा होणाऱ्या बोऱ्हाडेवाडी, इंद्रायणीनगर, सेक्टर ४, ६, ९, ११ व १२, शीवरस्ता, चक्रपाणी वसाहत, धावडेवस्ती, मोशी, चऱ्होली, डुडुळगाव, चोवीसावाडी तसेच इतर संबंधित परिसरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. या बंदमुळे शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित तसेच कमी दाबाने होण्याची शक्यता महापालिकेने व्यक्त केली आहे. त्यामुळे संबंधित परिसरातील नागरिकांनी ३ सप्टेंबरपूर्वी मनपाकडून उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा आणि पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिकांनी सहकार्य करून पाणीपुरवठा विभागाच्या नियोजित कामास हातभार लावावा, अशी विनंती महापालिकेने केली आहे.

# पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छतेचा जागर

## घरातूनच चार प्रकारे कचरा विलगीकरण करण्याचे महापालिकेचे आवाहन

■ **पिंपरी (दै. संध्या)**

कचरा विलगीकरण आणि योग्य कचरा व्यवस्थापनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' आणि 'माझी वसुंधरा ७.०' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून कचऱ्याचे ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजी योग्य कचरा अशा चार प्रकारे विलगीकरण, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे आणि स्वच्छता राखण्याचे आवाहन करण्यात आले. पथनाट्यानंतर नागरिकांना स्वच्छता शपथही देण्यात आली. पिंपरी चिंचवड महापालिकेचे महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला



बाबर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या वतीने चार प्रकारे कचरा विलगीकरण करण्याबाबत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात पथनाट्य, जनजागृती मोहीम आणि प्रत्यक्ष संवादाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्यात येत आहे. "शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेच्या यंत्रणेसोबत नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. कचरा निर्माण होण्याच्या ठिकाणीच त्याचे योग्य विलगीकरण झाल्यास कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने कचरा विलगीकरणाची सवय अंगीकारावी," असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

"कचरा विलगीकरण हा प्रभावी कचरा व्यवस्थापनाचा पाया आहे. नागरिकांनी ओला, सुका, सॅनिटरी, विशेष काळजी योग्य कचरा स्वतंत्रपणे देण्यासोबतच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये असे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले.

पथनाट्यातून दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य विलगीकरण न केल्याने उद्भवणाऱ्या समस्या तसेच कचरा व्यवस्थापनात नागरिकांची भूमिका याबाबत प्रभावीपणे संदेश देण्यात येत आहे. शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी नागरिकांनी कचरा विलगीकरणासह महापालिकेच्या स्वच्छता उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे.

## महानगरपालिका सेवेतून माहे ऑगस्ट २०२६ अखेर अधिकारी, कर्मचारी असे एकुण ३८ जण सेवानिवृत्त



### महापालिकेकडून सन्मानपत्र देऊन सत्कार

■ **पिंपरी (दै. संध्या)**

महापालिकेच्या सेवेत अनेक वर्षे प्रामाणिकपणे योगदान देणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची सेवा आणि त्यांचे योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याची आठवण महापालिकेस सदैव राहील तसेच त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आनंदी, निरोगी आणि समाधानाचे जावो असे प्रतिपादन उप आयुक्त संदीप खोत यांनी केले तसेच सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतून ऑगस्ट २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या २८ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या १० अशा एकूण ३८ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार व निरोप समारंभ आचार्य अत्रे रंगमंदिर, संत तुकाराम नगर येथे उत्साहात पार पडला, त्यावेळी शुभेच्छा देताना उप आयुक्त संदीप खोत बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त अधिकारी,कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेसाठी उप आयुक्त संदीप खोत यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाचे उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे, महादेव बोत्रे, तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी आणि सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी, सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार मुख्य लिपिक माया वाकडे यांनी मानले.

## कर्मयोगिनी महिला संस्थेतर्फे अखिल भारतीय मराठी पत्रलेखन स्पर्धा २०२६

■ **पिंपरी (दै. संध्या)**

कर्मयोगिनी महिला संस्थेच्या वतीने स्व. पुष्पाबाई गांधी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'पत्र पुष्पांजली' पत्रलेखन स्पर्धा भाग-२ आयोजित करण्यात आली आहे. या वर्षीच्या स्पर्धेसाठी Gen Z, तरुणाई, युवावर्ग तसेच नवयुवक-युवतींना पत्र हा विषय देण्यात आला असून, स्पर्धा सर्व वयोगटांसाठी खुली आहे. स्पर्धकांनी मराठी भाषेत जास्तीत जास्त २०० शब्दांचे पत्र लिहायचे आहे. पत्र हाताने लिहिलेले किंवा टाईप केलेले असावे. पत्राच्या खाली स्पर्धकाचे संपूर्ण नाव, पत्ता आणि संपर्क क्रमांक देणे आवश्यक आहे. स्पर्धकांनी आपली पत्रे ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत भारतीय डाक विभागाच्या रजिस्टर पोस्टाने पाठवावीत. तसेच टाईप केलेले पत्र ९९२२९५७५११ या क्रमांकावर



व्हॉट्सॲपद्वारेही पाठविता येणार आहे. पत्र पाठविण्याचा पत्ता : कर्मयोगिनी महिला संस्था, रो.हा. नंबर २, सुखवाणी क्लासिक, मोरवाडी, पिंपरी, पुणे – ४११०१८, महाराष्ट्र. स्पर्धेतील पहिल्या तीन सर्वोत्कृष्ट पत्रांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांकासाठी १,००० रुपये रोख व आकर्षक सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकासाठी ७०० रुपये रोख व सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांकासाठी ५०० रुपये रोख व सन्मानचिन्ह देण्यात येईल. याशिवाय उत्तेजनार्थ तीन पुरस्कारही जाहीर केले जाणार आहेत. स्पर्धेसाठी प्राप्त झालेल्या निवडक पत्रांचे संकलन करून त्याचे पुस्तकरूपाने विनामूल्य प्रकाशन करण्यात येणार आहे. स्पर्धेचा निकाल २०२७ च्या पहिल्या तिमाहीत जाहीर केला जाईल.

पत्रामध्ये कोणाच्याही भावना दुखावणारे, राजकीय तेढ किंवा सामाजिक दुही निर्माण करणारे अथवा अश्लील स्वरूपाचे मजकूर नसावेत. स्पर्धेच्या निकालासंदर्भातील सर्व अधिकार कर्मयोगिनी महिला संस्थेकडे राखीव असून, त्याबाबत कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही. तरुणाईच्या विचारांना, भावनांना आणि लेखनाला व्यासपीठ देणाऱ्या या अनोख्या उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कर्मयोगिनी महिला संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## गणेशोत्सवापूर्वी विसर्जन घाटांची कामे पूर्ण करा

■ **पिंपरी चिंचवड (दै. संध्या)**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रहाटणी-पिंपळे सौदागर परिसरातील शिवशंभो मंदिराशेजारील घाटासह परिसरातील विविध विसर्जन घाटांची मा. विरोधी पक्षनेते व नगरसेवक श्री. विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य, विद्युत आणि आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली.

गणेशोत्सव काळात मोठ्या संख्येने गणेशभक्त विसर्जन घाटांवर येत असल्याने नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याच्या सूचना नाना काटे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. विसर्जन घाट परिसरातील स्वच्छता व साफसफाईची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देतानाच घाट परिसरातील कचरा, अस्वच्छता आणि इतर अडचणी दूर करण्यावर त्यांनी भर दिला. तसेच परिसरातील विद्युत खांब व दिव्यांची तपासणी करून प्रकाश व्यवस्था सुरळीत करण्याच्या सूचना विद्युत विभागाला देण्यात आल्या. आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त फ्लड लाईट्स बसविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. घाटांची आवश्यक दुरुस्ती व डागडुजीची कामे गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी पूर्ण करावीत, अशा स्पष्ट



### नाना काटे यांच्याकडून परिसरातील घाटांची पाहणी

सूचना स्थापत्य विभागाला देण्यात आल्या. विसर्जनाच्या वेळी गर्दी मोठ्या प्रमाणात होत असल्याने घाट परिसर सुरक्षित राहील, याची विशेष काळजी घेण्याचेही त्यांनी सांगितले. "गणेशभक्तांना विसर्जनाच्या वेळी कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये. विसर्जन प्रक्रिया सुरक्षित, सुकर आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडण्यासाठी सर्व आवश्यक कामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, घाटांची सुरक्षितता आणि मूलभूत सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहता कामा नये," असे नाना काटे यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी स्थापत्य, विद्युत आणि आरोग्य विभागाने परस्पर समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी स्थापत्य विभागाचे उपअभियंता सुनील दांगडे, संजय बंडगर, कनिष्ठ अभियंता जाई जाधव, समृद्धी पाटील, आश्लेषा सानप, अमित पवार, आरोग्य निरीक्षक प्रणय चव्हाण, गणेश राजगे, विद्युत विभागाचे कनिष्ठ अभियंता बाप्पुसाहेब रोकडे, वीज पर्यवेक्षक राहुल संभु, असिफ शेख यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# शिक्षण कौशल्याचे अत्याधुनिक केंद्र महाराष्ट्रात उभारणार - आमदार शंकर जगताप

**• मोशीतील १५ हेक्टर जागेवर कौशल्य विकास केंद्राची उभारणी • पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या तीन तपांच्या अखंड समाजसाधनेला सरकारचे भक्कम बळ • औपचारिक शिक्षणासोबतच पारंपरिक ज्ञान, कला आणि कौशल्यांचे संवर्धन होणार**

■ **पिंपरी (दै. संध्या)**

महाराष्ट्रातील वंचित आदिवासी, भटके-विमुक्त आणि मागास समाजातील मुलांसाठी शिक्षण, संस्कार, कौशल्यविकास आणि स्वावलंबनाचे नवे सर्वांगीण विकास केंद्र महाराष्ट्रात खुले होणार आहे. पुणे जिल्ह्यातील मोशी येथे हे विकास केंद्र उभारण्याचा मार्ग राज्य सरकारच्या ऐतिहासिक निर्णयामुळे मोकळा झाला आहे, अशी माहिती चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी बुधवारी दिली.

राज्य सरकारने मोशी येथील १५ हेक्टर अर्थात सुमारे ३७ एकर शासकीय जमीन क्रांतिवीर चापेकर समिती संचालित क्रांतितीर्थ चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय आणि पुनरुत्थान समरसता गुरुकुलम अनुदानित आदिवासी आश्रमशाळेला देण्याचा निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. त्यानुसार महसूलमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या महसूल विभागाने ३१



ऑगस्ट २०२६ रोजी अधिकृत शासन ज्ञापन जारी केले आहे. महाराष्ट्रातील मागास आणि वंचित आदिवासी समाजासाठी या जागेवर सर्वांगीण विकास केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

पुणे जिल्ह्यातील मौजे मोशी, ता. हवेली येथील गट क्रमांक ३२७ (जुना सर्व्हे क्रमांक ३२५) मधील १५ हेक्टर जमीन संबंधित संस्थेला देण्यात येणार आहे. संस्था ही जमीन 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून धारण करणार आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील वंचित आदिवासी तसेच भटक्या-विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि संस्कारक्षम वातावरणात दर्जेदार शिक्षण घेण्याची व्यापक संधी निर्माण होणार आहे. औपचारिक शिक्षणासोबतच पारंपरिक ज्ञान, कला आणि कौशल्यांचे संवर्धन करून त्यांना आधुनिक शिक्षण व तंत्रज्ञानाची जोड देण्याचा अभिनव प्रयोग या केंद्रातून केला जाणार आहे.

क्रांतिवीर चापेकर समिती, क्रांतितीर्थ चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय आणि पुनरुत्थान समरसता गुरुकुलम यांच्या माध्यमातून प्रस्तावित जागेवर शिक्षण, निवासी प्रशिक्षण, संस्कार, संशोधन, पारंपरिक ज्ञान, आधुनिक कौशल्ये आणि सामाजिक विकास यांची सांगड घालणारे सर्वसमावेशक केंद्र विकसित करण्यात येणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान आणि स्वावलंबन निर्माण करण्यासाठी विविध शैक्षणिक व कौशल्याधारित उपक्रम राबविणे शक्य होणार आहे. आदिवासी आणि भटक्या-विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना प्रोत्साहन देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या प्रयत्नांना या प्रकल्पामुळे मोठे बळ मिळणार आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची संधी पोहोचवून सामाजिक पुनरुत्थान घडविण्याच्या दृष्टीने हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

मोशीतील १५ हेक्टर जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय म्हणजे पद्मश्री गिरीशजी प्रभुणे यांच्या तीन तपांच्या अखंड समाजसाधनेचा गौरव आहे. त्यांच्या कार्याचा विस्तार करून महाराष्ट्रातील अधिकाधिक वंचित विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण आणि स्वावलंबनाच्या संधी पोहोचविण्यासाठी सरकारने या निर्णयातून भक्कम पाठबळ दिले आहे असे आमदार जगताप म्हणाले

"आदिवासी, वंचित आणि भटक्या-विमुक्त समाजातील मुलांच्या शिक्षणासोबतच त्यांच्यातील पारंपरिक ज्ञान, कला आणि कौशल्यांचे जतन झाले पाहिजे, या ध्येयातून माझी समाजसाधना सुरू आहे. गेली तीन तपे अनेक सहकारी, कार्यकर्ते आणि संवेदनशील नागरिकांच्या सहकार्याने ही वाटचाल अखंडपणे सुरू आहे. मोशीतील १५ हेक्टर जागा उपलब्ध झाल्यामुळे या कार्याचा विस्तार करण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे. येथे शिक्षण, संस्कार, कौशल्य, संशोधन आणि स्वावलंबन यांची सांगड घालणारे सर्वांगीण विकास केंद्र उभारण्याचा आमचा संकल्प आहे. महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे मनःपूर्वक आभार."
**— पद्मश्री गिरीश प्रभुणे, संस्थापक, पुनरुत्थान समरसता गुरुकुलम**

### तीन तपांच्या समाजसाधनेचा गौरव

पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी आदिवासी, भटके-विमुक्त आणि वंचित समाजाच्या पुनरुत्थानासाठी तीन तपे अखंड समाजसाधना केली आहे. या समाजातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणतानाच त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचे, कला-कौशल्यांचे आणि सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन करण्याचा अभिनव शैक्षणिक प्रयोग त्यांनी उभा केला. गुरुकुलमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगभूत कला आणि पारंपरिक कौशल्यांना आधुनिक शिक्षणाची जोड दिली जाते. सामाजिक समरसता, संस्कार आणि स्वावलंबन यांवर आधारित या शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला जातो.

"मोशीतील १५ हेक्टर जमीन पुनरुत्थान समरसता गुरुकुलमला जागा देण्याचा निर्णय हा महाराष्ट्राच्या सामाजिक विकासातील ऐतिहासिक टप्पा आहे. पद्मश्री गिरीशजी प्रभुणे यांनी वंचित आदिवासी आणि भटक्या-विमुक्त समाजातील मुलांच्या विकासासाठी केलेल्या तीन तपांच्या अखंड समाजसाधनेला राज्य सरकारने या निर्णयातून भक्कम बळ दिले आहे. आपल्या सरकारची विकासाची भूमिका केवळ पायाभूत सुविधा निर्माण करण्यापुरती मर्यादित नाही. समाजातील शेवटच्या घटकाला शिक्षण, संस्कार, कौशल्य आणि स्वावलंबनाची संधी देऊन सामाजिक पुनरुत्थान घडविणे, हीच आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' या संकल्पनेला पुढे नेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या या दूरदृष्टीपूर्ण निर्णयामुळे महाराष्ट्राला सामाजिक समरसता आणि मानवी विकासाच्या क्षेत्रात नवी दिशा मिळेल."
**— शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ**

## थोडक्यात पण महत्वाचे



### युनिटी फ्रेंड्स सोशल क्लबचा दहीहंडी उत्सव रद्द; अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित

**बारामती : दैनिक संध्या**

युनिटी फ्रेंड्स सोशल क्लब,बारामती यांच्यावतीने सालाबाद प्रमाणे साजरा होणारा दहीहंडी उत्सव गौरवशाली परंपरा जपत मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मात्र यंदा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी झालेल्या अपघातामुळे यावर्षी होणारा दहीहंडी उत्सव रद्द करण्यात आला आहे.मंडळाचे आधारस्तंभ श्री. निलेश आप्पा इंगुले (नगरसेवक नगरपरिषद बारामती) यांनी याबाबत माहिती दिली. गेल्या अनेक वर्षांपासून मंडळाच्या विविध कार्यक्रमांना उपस्थित राहून मंडळाच्या कार्याचे कौतुक तसेच मार्गदर्शन करणारे,अखंड बारामतीकरांचा श्वास असलेले महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार आज आपल्यात नाहीत, ही संपूर्ण बारामतीकरांसाठी अत्यंत दुःखद व मनाला चटका लावणारी बाब आहे. स्व. अजितदादांचे मंडळाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते,त्यांनी वेळोवेळी दिलेले प्रोत्साहन आणि मार्गदर्शन यांची आठवण आजही मंडळाच्या प्रत्येक पदाधिकारी व सदस्याच्या मनात कायम आहे. या पार्श्वभूमीवर मंडळाचे आजी-माजी पदाधिकारी, सभासद,ज्येष्ठ नेते मंडळी व सहकाऱ्यांच्या विचार विनिमयानंतर,यावर्षी युनिटी फ्रेंड्स सोशल क्लब तर्फे कोणताही उत्सव अथवा आनंदोत्सवाचा कार्यक्रम आयोजित न करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला आहे.यावेळी स्व.अजितदादांच्या पवित्र स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

### प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**बारामती : दैनिक संध्या**

वातावरणातील बदल आणि पावसाचे असमान वितरण यामुळे बारामती तालुक्यातील ऊस पिकावर खोडकिडा, पांढरीमाशी, हुमणी व पायरीला या किडींचा तसेच तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव काही प्रमाणात दिसून येत आहे. किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये शेतकऱ्यांना प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी प्रति एकर २ ते ४ किलो मेटारायझियम ॲनिसोप्ली हे जैविक बुरशीनाशक शेणखतात मिसळून जमिनीत द्यावे किंवा फिप्रोनील ०.३ टक्के जीआर ३ ते ४ किलो प्रति एकर वापरावे. खोडकिडीच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर ३० ते ४५ दिवसांनी क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली २०० लिटर पाण्यात मिसळून एक एकर क्षेत्रावर फवारणी करावी. तसेच कामगंध सापळे एकरी ५ ते ६ या प्रमाणात वापरावे. पांढरीमाशीच्या नियंत्रणासाठी सुरुवातीच्या काळात पिवळे चिकट सापळे प्रति एकर १० ते १२ लावावेत. प्रादुर्भाव वाढल्यास इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के एसएल ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पायरीला किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास सिलिअम लेकोनी १.१५ या जैविक बुरशीनाशकाचा वापर करावा. तसेच क्लोरोपायरीफॉस २ टक्के ईसी ३० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करता येईल. तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब ७५ टक्के,डब्ल्यूपी २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कृषी विभागामार्फत ऊस पिकावरील किडी व रोगांची ओळख, नियंत्रण तसेच शिफारस केलेल्या कीटकनाशकांच्या वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. महाविस्तार एआय ॲपचा वापर करून किडी व रोगांची ओळख करून कृषी विभागाच्या शिफारशीनुसारच कीटकनाशकांचा वापर करावा, असे आवाहनही श्री. हाके यांनी केले आहे.

# आरोपीच्या मुसक्या आवळल्या; पोलिसांच्या पहाटेच्या सापळ्याला यश

## पोलीस हवालदार उदय टापरे यांची धडाकेबाज कामगिरी; न्यायालयीन वॉरंट बजावणीत पुन्हा एकदा अचूक नियोजनाचा प्रत्यय

■ "वॉरंट जुने असो अथवा नवीन, न्यायालयीन आदेशाची बजावणी होणारच"



तब्बल १२ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या न्यायालयीन पकड वॉरंटची बजावणी करून संबंधित इसमास न्यायालयासमोर उभे करण्याची ही कामगिरी त्यांच्या चिकाटीची, कर्तव्यनिष्ठेची आणि न्यायालयीन आदेशांप्रती असलेल्या जबाबदारीची साक्ष देणारी आहे. बारामती शहर पोलिसांनी या कारवाईतून स्पष्ट संदेश दिला आहे की, न्यायालयीन वॉरंट काढल्यानंतर ठिकाण बदलून किंवा दीर्घकाळ पोलिसांना मिळून न आल्याने न्यायालयीन प्रक्रियेपासून कायम दूर राहता येणार नाही. प्रलंबित वॉरंटची काटेकोरपणे बजावणी करून संबंधित व्यक्तींना न्यायालयासमोर हजर करण्याची मोहीम यापुढेही तितक्याच प्रभावीपणे सुरू राहणार आहे. पोलीस हवालदार श्री. उदय टापरे यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे बारामती शहर पोलीस स्टेशनच्या न्यायालयीन वॉरंट बजावणीच्या कामकाजाला आणखी धार मिळाली असून, त्यांच्या अचूक नियोजनाचे, सातत्याचे व कर्तव्यतत्परतेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहर पोलीस स्टेशनच्या अंमलदारांनी न्यायालयीन आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करत सन २०१४ पासून सुमारे १२ वर्षे न्यायालयीन पकड वॉरंट प्रलंबित असलेल्या सागर लक्ष्मण जाधव, रा. कसबा, बारामती यास पहाटेच्या नियोजनबद्ध कारवाईत ताब्यात घेऊन मा. न्यायालयासमोर हजर केले आहे.

सदर इसमाविरुद्ध Negotiable Instruments Act, 1881 चे कलम 138 अन्वये चेक अनादराचे प्रकरण मा. न्यायालयात प्रलंबित असून, त्यास न्यायालयासमोर हजर करण्यासाठी Non-Bailable Warrant (NBW) जारी करण्यात आले होते. दीर्घ कालावधीपासून संबंधित इसम मिळून येत नसल्याने वॉरंटची बजावणी प्रलंबित होती. बारामती शहर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार श्री. उदय टापरे यांनी सदर वॉरंटची बजावणी करण्याचे आव्हान स्वीकारून संबंधित इसमाच्या हालचाली व वास्तव्याबाबत गोपनीय माहिती संकलित केली. आरोपी पहाटेच्या वेळी घरी मिळण्याची शक्यता असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर त्यांनी नियोजनपूर्वक त्याच्या घराजवळ सापळा रचला. आज सकाळी संबंधित इसम घरी मिळून आला. पोलिसांची चाहूल लागताच त्याने तेथून निघून जाण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलीस हवालदार उदय टापरे यांनी प्रसंगावधान राखत तत्काळ पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. त्यानंतर न्यायालयीन पकड वॉरंटची कायदेशीररीत्या बजावणी करून त्यास मा. न्यायालयासमोर हजर करण्यात आले. मा. न्यायालयाने प्रकरणातील वस्तुस्थिती व प्रलंबित न्यायालयीन कार्यवाही विचारात घेऊन आवश्यक आदेश पारित केले असून, मा. न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित इसमाची येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे रवानगी करण्यात आली आहे. पोलीस हवालदार श्री. उदय टापरे हे न्यायालयीन वॉरंटवरील आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेषतः पहाटेच्या वेळेत गोपनीय माहितीच्या आधारे घराजवळ अथवा संभाव्य ठिकाणी सापळा लावून कारवाई करण्यासाठी ओळखले जातात. दीर्घकाळ मिळून न येणाऱ्या व्यक्तींचा शोध घेणे, त्यांच्या हालचालींची खातरजमा करणे आणि योग्य वेळ साधून कोणताही अनुचित प्रकार घडू न देता त्यांना ताब्यात घेऊन न्यायालयासमोर हजर करणे, ही त्यांची कार्यपद्धती ठरली आहे.

## श्रीवर्धन शुगर्समध्ये बॉयलर पूजन उत्साहात संपन्न




■ काटी (धाराशिव) (दै. संध्या)

■ गळीत हंगाम २०२६-२७ च्या यशस्वी प्रारंभासाठी सज्जता पूर्ण

श्रीवर्धन ॲग्रो प्रा.लि.संचलित श्रीवर्धन शुगर्स येथे गळीत हंगाम २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर बॉयलर पूजन व अग्निप्रदीपन सोहळा धार्मिक व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. वैदिक मंत्रोच्चार व विधिवत पूजा करून बॉयलरचे पूजन करण्यात आले. आगामी गळीत हंगाम यशस्वी, सुरक्षित व भरघोस व्हावा तसेच परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी यावी, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली. याप्रसंगी कारखान्याचे संचालक औदुंबर डिसले, मंदाकिनी डिसले, GM महादेव डिसले, आर्मी अधिकारी पोपट ढेंगळे, माजी सरपंच प्रशांत (पापा) कापसे, नेताजी डिसले, बाबा कापसे, गणेश कापसे, रमेश ढेंगळे, चंद्रकात डिसले, बालाजी डिसले, चिफ इंजिनीयर सादिक मुंढे, चिफ केमिस्ट पाटील, बापू कापसे, शेतकी अधिकारी कदम, ठोंबरे, सर्व खातेप्रमुख, सर्व कर्मचारी तसेच परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी व हितचिंतक उपस्थित होते. बॉयलर पूजन हा साखर कारखान्याच्या गळीत हंगामाच्या प्रारंभापूर्वीचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून, यानिमित्ताने कारखान्याच्या आगामी हंगामातील कार्याला शुभारंभ करण्यात आला. कारखान्यातील दुरुस्ती, देखभाल व तांत्रिक कामे अंतिम टप्प्यात असून आगामी गळीत हंगामासाठी श्रीवर्धन शुगर्स पूर्ण क्षमतेने सज्ज असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने, नियोजनबद्ध पद्धतीने आणि सकारात्मक दृष्टिकोनातून काम करून आगामी गळीत हंगाम यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी सर्वांनी एक संकल्प केला. "सुरक्षितता प्रथम, गुणवत्ता सर्वोत्तम आणि उत्पादनात सातत्य!" या ब्रीदवाक्याप्रमाणे शेतकरी, कर्मचारी आणि व्यवस्थापन यांच्या सामूहिक प्रयत्नातून श्रीवर्धन शुगर्स प्रगतीची नवी उंची गाठेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. गळीत हंगाम २०२६-२७ हा शेतकरी व कारखाना यांच्यातील विश्वास, सहकार्य आणि समृद्धीचा नवा अध्याय ठरेल, असा आशावाद बॉयलर पूजन सोहळ्याच्या निमित्ताने व्यक्त करण्यात आला.

# श्री सोमेश्वर कारखाना निवडणुकीचा रणसंग्राम

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची गावोगावी मोर्चेबांधणी; राजकीय हालचालींना वेग

■ सोमेश्वरनगर (दै. संध्या)




श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर कारखाना कार्यक्षेत्रातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विविध गावांमध्ये घोंगडी बैठका आयोजित करून कारखान्याच्या सभासदांशी थेट संवाद साधण्यास सुरुवात केली आहे.

मुरूम, वाणेवाडी, करंजे, शेंडकरवाडी, मगरवाडी, वाकी, चौधरवाडी आणि खंडोबाचीवाडी या गावांमध्ये नुकत्याच बैठका घेण्यात आल्या. या बैठकींमध्ये कारखान्याची सद्यस्थिती, सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच आगामी निवडणुकीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घरोघरी तसेच गावोगावी जाऊन सभासदांच्या भेटीगाठी घेत त्यांच्या भावना, अपेक्षा आणि कारखान्याबाबतच्या सूचना जाणून घेण्याचा प्रयत्न केला. घोंगडी बैठकीच्या माध्यमातून थेट सभासदांपर्यंत पोहोचण्याची ही रणनीती सध्या कारखाना परिसरात चर्चेचा विषय ठरत असून, या संवाद बैठकींना सभासदांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. सोमेश्वर कारखान्याची अंतिम मतदार यादी नुकतीच प्रसिद्ध झाल्यानंतर निवडणूक प्रक्रियेला वेग आला आहे. त्यामुळे विविध राजकीय गटांनीही आपापली मोर्चेबांधणी सुरू केली असून, इच्छुक उमेदवारांनी सभासदांच्या गाठीभेटींवर भर दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे युवा नेते योगेंद्र पवार यांनी काही दिवसांपूर्वी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मेळावा घेत कारखाना निवडणुकीत सक्रिय भूमिका घेण्याचे संकेत दिले होते. त्यानंतर आता कार्यकर्त्यांकडून गावपातळीवर बैठका घेत थेट सभासदांशी संपर्क वाढविण्यात येत आहे. दरम्यान, निवडणूक बिनविरोध होणार की विविध राजकीय गट स्वतंत्रपणे मैदानात उतरणार, याबाबत सभासदांमध्ये उत्सुकता आहे. भाजप, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना तसेच स्थानिक गटांच्या भूमिकेकडेही कारखाना कार्यक्षेत्राचे लक्ष लागले आहे. एकीकडे बिनविरोध निवडणुकीची चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे विविध गावांमध्ये सुरू झालेल्या बैठका आणि संपर्क मोहिमांमुळे सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीचा रणसंग्राम हळूहळू रंगू लागल्याचे चित्र आहे. येत्या काही दिवसांत निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर कारखाना परिसरातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष राजेंद्रबापू जगताप, मा. पुणे जिल्हा परिषद सभापती दत्ताआबा चव्हाण, मा. पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष सतीशमामा खोमने, प्रदीप गीते, अनिलशेठ शहा, प्रवीणदादा भोसले, प्रदीप शेंडकर, सागर मदने, निवृती शेंडकर, केतन भोसले ,शशीभाऊ काकडे ,राजेंद्र लकडे, इत्यादी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मतदारांशी संवाद साधत आहेत.

# गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित करा; पण कर्णकर्कश DJ ने आरोग्य धोक्यात घालू नका!

■ मा. पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांची गणेशोत्सव मंडळांना स्पष्ट सूचना

■ "उत्सवाला पोलीस प्रशासनाचे पूर्ण सहकार्य; मात्र ध्वनीप्रदूषण, कायद्याचे उल्लंघन आणि नागरिकांना त्रास देणाऱ्या DJ बाबत कोणतीही तडजोड नाही"




■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहर व तालुक्यात आगामी दहीहंडी व गणेशोत्सव शांततामय, सुरक्षित, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, गणेशोत्सव मंडळांच्या अडचणी प्रशासनापर्यंत थेट पोहोचाव्यात तसेच विविध शासकीय विभाग आणि उत्सव मंडळांमध्ये प्रभावी समन्वय निर्माण व्हावा, या उद्देशाने दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी कविवर्य मोरोपंत हॉल, बारामती येथे भव्य समन्वय व मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले.

सदर बैठकीस बारामती शहर पोलीस स्टेशन, बारामती तालुका पोलीस स्टेशन, वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन, सुपा पोलीस स्टेशन आणि माळेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील दहीहंडी मंडळे व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे सुमारे ३०० ते ४०० अध्यक्ष, पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीस मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण श्री. संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम, उपविभागीय अधिकारी/प्रांत अधिकारी श्री. दिघे, तहसीलदार श्री. रावडे, माळेगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. संकपाळ, सुपा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत शेळके, वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. जीवन मोहिते, बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष श्री. सचिन सातव तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपरिषद व इतर संबंधित विभागांचे अधिकारी एकाच मंचावर उपस्थित होते.

बैठकीत विविध गणेशोत्सव मंडळांच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांना आपल्या समस्या व सूचना थेट प्रशासनासमोर मांडण्याची संधी देण्यात आली. गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील झाडांच्या वाढलेल्या फांद्या, रस्त्यावरील स्पीड ब्रेकर व उंचवटे, विद्युत तारा, मार्गातील इतर अडथळे, वाहतूक नियोजन, मंडप व्यवस्था तसेच DJ व ध्वनीव्यवस्थेबाबतचे प्रश्न मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी मांडले.

गणेशोत्सवाच्या काळात प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणी उत्सव सुरू होण्यापूर्वीच दूर व्हाव्यात, यासाठी संबंधित शासकीय विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा मंडळांकडून व्यक्त करण्यात आली. यावर उपस्थित सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी समस्या गांभीर्याने घेत, त्यांच्या अखत्यारितील अडचणी प्राधान्याने सोडविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. बारामती नगरपरिषदेच्या वतीने नगराध्यक्ष श्री. सचिन सातव यांनी गणेशोत्सव मंडळांना आवश्यक ते सर्व प्रशासकीय सहकार्य देण्यात येईल तसेच नगरपरिषदेशी संबंधित समस्या निदर्शनास आणून दिल्यास त्या शक्य तितक्या तातडीने दूर करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

बैठकीतील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा ठरला तो DJ, मोठ्या क्षमतेच्या साऊंड सिस्टीम आणि ध्वनीप्रदूषणाचा. मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल यांनी याबाबत अत्यंत स्पष्ट शब्दांत भूमिका मांडत सांगितले की, गणेशोत्सव हा आनंदाचा, भक्तीचा आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. उत्सव साजरा करण्यासाठी पोलीस प्रशासन मंडळांच्या पाठीशी पूर्णपणे उभे राहील; मात्र उत्सवाच्या नावाखाली कर्णकर्कश आवाज करून महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि सर्वसामान्य नागरिकांना त्रास देण्याचा कोणालाही अधिकार नाही. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि ध्वनीप्रदूषणाच्या कायद्याच्या अंमलबजावणीत कोणताही कॉम्प्रमाईज होणार नाही, असा स्पष्ट संदेश त्यांनी आयोजक मंडळे, DJ चालक आणि DJ मालकांना दिला. गणेशोत्सवाच्या काळात ध्वनीमर्यादांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित ठिकाणी ध्वनीमापक यंत्रांच्या माध्यमातून आवाजाची प्रत्यक्ष मोजणी करण्यात येणार असल्याचे मा. पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट केले. एखाद्या व्यक्तीच्या तक्रारीवर किंवा अंदाजावर कारवाई न करता, उपलब्ध तांत्रिक साधनांच्या मदतीने ध्वनीपातळीची नोंद घेऊन त्या त्या क्षेत्रासाठी कायद्याने निर्धारित केलेल्या अनुज्ञेय ध्वनीमर्यादांचे उल्लंघन आढळल्यास पुराव्यावर आधारित कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे.

### "उत्सव तुमचा, सुरक्षा आपली सर्वांची"

संपूर्ण बैठकीत पोलीस प्रशासनाने मंडळांशी संघर्षाची नव्हे तर समन्वय आणि सहकार्याची भूमिका स्पष्ट केली. मंडळांच्या रास्त अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन तत्पर राहील, परंतु नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित नियमांकडे दुर्लक्ष केले जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देण्यात आला.

आवश्यकतेनुसार एकापेक्षा अधिक ध्वनीमापक यंत्रांचा वापर करून नोंदी घेण्यात येतील. न्यायालयीन निर्देश, Noise Pollution (Regulation and Control) Rules तसेच सक्षम प्राधिकरणाने घालून दिलेल्या अटींचे काटेकोर पालन केले जाईल. DJ च्या अतितीव्र आवाजाचे परिणाम उपस्थित पदाधिकाऱ्यांना समजावून सांगताना मा. पोलीस अधीक्षकांनी विशेषतः महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि हृदयविकार अथवा इतर आजारांनी त्रस्त असलेल्या नागरिकांना होणाऱ्या त्रासाकडे लक्ष वेधले. अतितीव्र आवाजामुळे श्रवणशक्तीवर परिणाम होणे, डोकेदुखी, चिडचिड, मानसिक ताण वाढणे तसेच रुग्ण व ज्येष्ठ नागरिकांना गंभीर त्रास होण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे प्रचंड आवाजामुळे मिरवणुकीत पोलीस अथवा स्वयंसेवकांकडून दिल्या जाणाऱ्या आपत्कालीन सूचना ऐकू न आल्यास गर्दी व्यवस्थापनातही अडथळा निर्माण होऊ शकतो. DJ च्या आवाजाची मंडळा-मंडळांमध्ये स्पर्धा निर्माण होणे, रस्त्यावर मोठी DJ वाहने उभी राहिल्याने वाहतूक कोंडी होणे तसेच गर्दीत धक्काबुक्की किंवा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता लक्षात घेता प्रत्येक मंडळाने स्वतःहून जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले.

मा. पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट केले की, "परवानगी घेतली म्हणजे अमर्याद आवाज करण्याची परवानगी मिळाली" असा गैरसमज कोणीही करून घेऊ नये.

ध्वनिक्षेपकाची परवानगी, त्यातील अटी, वेळेची मर्यादा, परिसराच्या वर्गवारीनुसार लागू असलेली ध्वनीमर्यादा तसेच न्यायालयीन आदेश यांचे पालन प्रत्येक आयोजक, DJ मालक आणि DJ चालकावर बंधनकारक आहे.

उल्लंघन आढळल्यास संबंधित व्यक्ती कोण आहे, मंडळ किती मोठे आहे किंवा त्याचा प्रभाव किती आहे याचा विचार न करता कायद्याप्रमाणे समान आणि निष्पक्ष कार्यवाही केली जाईल, असा ठाम संदेश देण्यात आला. कायदा पाळून उत्सव साजरा करणाऱ्या प्रत्येक मंडळाला पोलीस प्रशासनाचे पूर्ण सहकार्य राहील; परंतु जाणूनबुजून नियम मोडणाऱ्यांनी कारवाई होणार नाही अशा भ्रमात राहू नये, असेही स्पष्ट करण्यात आले. मा. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाचा केंद्रबिंदू दंडात्मक कारवाईपेक्षा जबाबदार उत्सव संस्कृती निर्माण करणे हा होता. गणेशोत्सवामध्ये आरती, भजन, अभंग, ढोल-ताशा, लेझीम, सांस्कृतिक व सामाजिक प्रबोधनाचे कार्यक्रम यांना प्राधान्य देऊन पारंपरिक उत्सवाची ओळख जपावी. केवळ मोठ्या आवाजाला प्रतिष्ठेचे किंवा मंडळाच्या मोठेपणाचे प्रतीक बनवू नये, असे आवाहन करण्यात आले. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, महिला सुरक्षा, सायबर जनजागृती, व्यसनमुक्ती, वाहतूक शिस्त, रक्तदान, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक प्रबोधनासारख्या उपक्रमांमधून मंडळांनी समाजापुढे आदर्श निर्माण करावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. बैठकीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मंडप उभारणी, विद्युत सुरक्षा, अग्निशमन व्यवस्था, CCTV, स्वयंसेवक नियुक्ती, महिलांची व बालकांची सुरक्षा, गर्दी व्यवस्थापन, पार्किंग, वाहतूक, महाप्रसाद व अन्नसुरक्षा, आपत्कालीन संपर्क व्यवस्था, गणेशमूर्ती आगमन आणि विसर्जन मिरवणूक याबाबतही आवश्यक सूचना देण्यात आल्या. मंडपामुळे रुग्णवाहिका, अग्निशमन दल किंवा इतर आपत्कालीन वाहनांचा मार्ग बंद होणार नाही, विद्युत जोडणी अधिकृत इलेक्ट्रिशियनकडून करण्यात येईल, अग्निशामक यंत्रे उपलब्ध राहतील, संशयास्पद वस्तू अथवा व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती दिली जाईल तसेच मिरवणुकीदरम्यान मद्यपान, मादक पदार्थांचे सेवन, धोकादायक शस्त्रांचे प्रदर्शन आणि सामाजिक किंवा धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या घोषणा यांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले.

विसर्जन मिरवणुकीसाठी प्रशासनाने निश्चित केलेला मार्ग व वेळ पाळणे, विनापरवानगी मार्ग न बदलणे, विद्युत तारा व झाडांच्या फांद्यांची पूर्वतपासणी करणे तसेच विसर्जन स्थळी पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या सूचनांचे पालन करणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल यांच्या मार्गदर्शनातून एकच भूमिका अधोरेखित झाली. "गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करा. परंपरा जपा, भक्ती जपा, सामाजिक एकोपा जपा; परंतु कर्णकर्कश आवाज करून दुसऱ्याच्या आरोग्यावर आणि शांततेवर अतिक्रमण करू नका. कायदा पाळणाऱ्या प्रत्येक मंडळास पोलीस प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य राहील; कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याबाबत मात्र कोणतीही तडजोड केली जाणार नाही." पोलीस प्रशासनाने सर्व गणेशोत्सव मंडळे, DJ चालक-मालक, कार्यकर्ते आणि नागरिकांना "सुरक्षित गणेशोत्सव – शांततामय गणेशोत्सव – शिस्तबद्ध गणेशोत्सव – पर्यावरणपूरक गणेशोत्सव" साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### माळेगाव कॉलनी शाळेत राष्ट्रीय क्रीडा दिन व रक्षाबंधन सण उत्साहात साजरा

**बारामती : दैनिक संध्या**

नगरपरिषद शाळा माळेगाव कॉलनी येथे राष्ट्रीय क्रीडा दिन व रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला.हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दि. २८ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत शाळेत विविध क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील शिक्षकांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची व क्रीडा क्षेत्रातील योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शाळेत विद्यार्थ्यांसाठी कबड्डी,खो-खो, सायकलिंग,लंगडी आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत आपले क्रीडा कौशल्य दाखविले. तसेच सणांचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे व त्यांनी सण - उत्सव साजरे करावेत यासाठी शाळेत रक्षाबंधन सणाचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी शाळेतील मुलींनी सहभागी होत मुलांना राख्या बांधल्या व मोठ्या उत्साहात रक्षाबंधन सण साजरा केला. या कार्यक्रमासाठी श्री.गजानन सरगर (मुख्याध्यापक), श्री.भैरवनाथ पर्वते,कल्पना चौधरी,प्रज्ञा शेंडे,कोमल जाधव,मनीषा जाधव-गोरे,नंदा जगताप यांनी विशेष परिश्रम घेतले.

### स्व. अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण व फळझाडांच्या रोपांचे वाटप

**बारामती : दैनिक संध्या**

अंजनगाव (ता. बारामती) : महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व बारामती तालुक्याचे भाग्यविधाते स्व.अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्त अंजनगाव येथे फळझाडांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थ अंजनगाव व श्रमदान ग्रुप यांच्या आयोजनातून हा उपक्रम राबविण्यात आला असून,स्वराज फर्निचर श्री.सुरेश शिवाजी परकाळे यांच्या विशेष सहकार्याने वृक्षवाटप करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमावेळी डॉ.स्वप्नील चौधरी (प्रसिद्ध व्याख्याते),श्री.गणेश बिरादार सो (अतिरिक्त पोलीस अधीक्षक),श्री.हनुमंत पाटील (अतिरिक्त जिल्हाधिकारी),श्री.रमेश चोपडे (अतिरिक्त पोलीस अधीक्षक), श्री.संभाजी नाना होळकर (जिल्हाध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस),श्री.पुरुषोत्तम दादा जगताप (चेअरमन,श्री.सोमेश्वर सहकारी साखर कारखाना),श्री.किरण तावरे (सभापती,पंचायत समिती),श्री.संदीप बांदल (तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस) हे मान्यवर उपस्थित होते. "स्व.अजितदादांच्या स्मृती जपूया, हरित अंजनगाव घडवूया!" असा संदेश देत ग्रामस्थांनी या वृक्षवाटप उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

### भारती हॉस्पिटलमध्ये DEKA चे अत्याधुनिक लेझर तंत्रज्ञान दाखल

**पुणे : दैनिक संध्या**



भारती विद्यापीठाच्या धनकवडी येथील भारती हॉस्पिटलमध्ये इटलीतील DEKA International कंपनीच्या अत्याधुनिक लेझर तंत्रज्ञानावर आधारित Toro Pico Nano आणि RedTouch PRO या दोन प्लॅटफॉर्मची स्थापना करण्यात आली आहे. जियोमेडिक्स फार्मा प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहकार्याने या तंत्रज्ञानाचे लोकार्पण व प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. त्वचारोग क्षेत्रातील आधुनिक लेझर-आधारित उपचार पद्धती तसेच वैद्यकीय शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग होणार आहे. विद्यापीठ संचालित अध्यापन रुग्णालयात अशा विशेषीकृत प्लॅटफॉर्मची उपलब्धता विद्यार्थ्यांना, प्रशिक्षणार्थींना आणि डॉक्टरांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यास उपयुक्त ठरणार आहे. Toro Pico Nano हा विशेषीकृत त्वचारोगविषयक लेझर प्लॅटफॉर्म असून, विशिष्ट प्रकारच्या पिग्मेंटेशनशी संबंधित त्वचाविषयक समस्यांच्या व्यवस्थापनासाठी त्याचा वापर केला जाऊ शकतो.
तर RedTouch PRO हे 675 nm wavelength वर आधारित regenerative laser technology प्लॅटफॉर्म आहे. कोलॅजनच्या पुनर्रचनेसाठी तसेच विशिष्ट melanin आणि pigmentation-related concerns हाताळण्यासाठी हे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. दोन्ही तंत्रज्ञानांचा वापर रुग्णाचे वैद्यकीय मूल्यांकन आणि निर्धारित क्लिनिकल प्रोटोकॉलनुसार केला जाणार आहे.

# वंचित राहिलेल्या २४६ नौकामालकांना न्याय द्या

## विशेष आर्थिक सहाय्य मिळवून देण्यासाठी प्रस्ताव शासन दरबारी सादर करा- उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

■ **मुंबई (दै. संध्या)**

क्यार व महाचक्री वादळामुळे नुकसान झाल्यानंतरही शासनाच्या विशेष आर्थिक सहाय्यापासून वंचित राहिलेल्या रायगड जिल्ह्यातील २४६ नौकामालकांना न्याय मिळवून देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले आहेत.



दर्यावर्दी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्यादित, मु. घोडाबंदर, पो. वढाव, ता. पेण, जि. रायगड यांच्या वतीने करण्यात आलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने विधानभवन येथील उपाध्यक्ष कार्यालयाच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत नौका नोंदणीचे काम नव्याने जिल्हा कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्यामुळे तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव नौका नोंदणी आणि परवाना प्रक्रियेत विलंब झाल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली. या प्रशासकीय विलंबामुळे अनेक पात्र मच्छीमार शासनाच्या विशेष आर्थिक सहाय्यापासून वंचित राहिल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

तसेच, बिगर यांत्रिक नौकाधारक सागरी मच्छीमारांनाही क्यार व महाचक्री वादळाच्या तडाख्यामुळे मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या सर्व बाबींचा सहानुभूतीपूर्वक आणि सकारात्मक विचार करून विशेष आर्थिक सहाय्यापासून वंचित राहिलेल्या सर्व पात्र मच्छीमारांना न्याय मिळवून देण्याची आवश्यकता असल्याचे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी स्पष्ट केले. वंचित राहिलेल्या २४६ नौकामालकांसह अन्य पात्र मच्छीमारांना विशेष आर्थिक सहाय्य मंजूर करण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव तातडीने तयार करून शासनाकडे सादर करावा व त्यास मंजुरी मिळविण्यासाठी कार्यवाही करावी, असे निर्देश अण्णा बनसोडे यांनी संबंधित मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीस संबंधित मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी तसेच दर्यावर्दी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अनिरुद्ध शेखर निकम यांची 'यूथ एम्पॉवरमेंट फोरम २०२६'साठी निवड

■ **चिपळूण (दै. संध्या)**

जिनिव्हा, स्वित्झर्लंड येथे ३ ते ६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या 'यूथ एम्पॉवरमेंट फोरम २०२६'साठी सह्याद्रि शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष तथा आमदार शेखर निकम यांचे चिरंजीव अनिरुद्ध शेखर निकम यांची निवड झाली आहे. या आंतरराष्ट्रीय युवा मंचामध्ये जगभरातील सुमारे १०० युवा सहभागी होणार आहेत. युनायटेड नेशन्स आणि सेंटर फॉर ग्लोबल डायलॉग अँड लीडरशिप यांच्या आयोजनातून हा आंतरराष्ट्रीय मंच होत आहे. या फोरमदरम्यान युनायटेड नेशन्स मुख्यालय, जिनिव्हा, वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन तसेच इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन येथे संस्थात्मक व अभ्यासभेटी आयोजित करण्यात आल्या आहेत. यासह विशेष ब्रीफिंग आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी संवादाची संधीही



सहभागी युवकांना मिळणार आहे. फोरममध्ये 'लीडरशिप अँड स्किल बिल्डिंग' तसेच 'ह्युमॅनिटेरियन डिप्लोमसी' या विषयांवरील कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय 'यूएन सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स ग्रँट पिच कॉम्पिटिशन'ही होणार आहे. या माध्यमातून युवा सक्षमीकरण, जागतिक धोरण, शाश्वत विकास, कामगार धोरण आणि आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण या विषयांवर आंतरराष्ट्रीय स्तरावरील संवादाची संधी उपलब्ध होणार आहे.

## UWA इंडियाला मुंबई कॅम्पससाठी मिळाली अंतिम मंजुरी

■ **पुणे (दै. संध्या)**

'युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया' (UWA) - जी जगातील सर्वोत्तम १०० विद्यापीठांपैकी एक आणि ऑस्ट्रेलियाच्या प्रतिष्ठित 'आठ जणांचा गट' (Group of Eight) ची सदस्य आहे - तिला मुंबईतील आपल्या आंतरराष्ट्रीय शाखा परिसरासाठी (कॅम्पस)'युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन'(UGC) कडून मंजुरीचे पत्र (LOA) प्राप्त झाले आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये हा कॅम्पस सुरू होण्याच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. या मंजुरीमुळे UWA मुंबईत आपल्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे सरकली आहे. तसेच, भारतात राहूनच जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त ऑस्ट्रेलियन विद्यापीठाचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा एका नवीन अध्यायाचा प्रारंभ आहे. 'युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया'च्या चान्सलर डॉ. डायन स्मिथ-गँडर (AO) म्हणाल्या: "UWA मुंबईची सुरुवात होणे हा विद्यापीठासाठी आणि भारतासोबतच्या आमच्या संबंधांसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, यामुळे विद्यार्थ्यांसाठी नवीन संधी निर्माण होत आहेत; त्यांना UWA चे जागतिक दर्जाचे शिक्षण तर मिळेलच, पण त्याच वेळी ते भारतातील संधी, समुदाय आणि आकांक्षांशीही जोडलेले राहू शकतील. आमच्या या प्रवासातील या टप्प्यावर पोहोचल्याचा आम्हाला आनंद आहे आणि मुंबईत आमच्या पहिल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यास आम्ही उत्सुक आहोत." सप्टेंबरमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी सज्ज असलेल्या UWA मुंबई कॅम्पसमध्ये शिक्षणाचा असा अनुभव मिळेल, ज्यामध्ये UWA चे शैक्षणिक निकष आणि जागतिक दृष्टिकोन यांचा संगम मुंबईतील गतिमान व्यवसाय, तंत्रज्ञान, वित्त आणि नवोपक्रम (इनोव्हेशन) परिसंस्थेशी (इकोसिस्टम) साधला जाईल.



## वर्गातून थेट उद्योगाच्या जगात! बारामतीत विद्यार्थ्यांनी जाणून घेतला खाद्य स्टार्टअपचा प्रवास

### पुण्यातील आठ शाळांमधील ८० विद्यार्थ्यांना खाद्यप्रक्रिया, फूड-टेक व उद्योजकतेचा प्रत्यक्ष अनुभव

■ **बारामती (दै. संध्या)**

विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम,वैज्ञानिक दृष्टिकोन आणि उद्योजकतेला चालना देण्याच्या उद्देशाने केंद्रीय अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालय (MoFPI) आणि अटल इनोव्हेशन मिशन (AIM),नीती आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या ATL–CIC Engagement Programme अंतर्गत पुण्यातील आठ शाळांमधील ८० विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट बारामती येथील शारदाबाई पवार फूड इनक्यूबेशन सेंटर येथे आयोजित करण्यात आली.या भेटीत विद्यार्थ्यांनी खाद्यप्रक्रियेसोबतच स्टार्टअप उभारणी,उद्योजकता विकास, इनक्युबेशन आणि शासकीय स्टार्टअप सहाय्यव्यवस्थेची प्रत्यक्ष माहिती घेतली.या भेटीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना स्टार्टअप म्हणजे काय,नाविन्यपूर्ण कल्पनेचे उत्पादनात रूपांतर कसे करता येते,प्रोटोटाइप तयार करण्यापासून व्यवसाय उभारणीपर्यंत कोणते टप्पे असतात,याची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता खाद्यप्रक्रिया,आधुनिक तंत्रज्ञान,नवोपक्रम आणिउद्योजकतेचाप्रत्यक्षअनुभवदेणेहाया उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या,शारदाबाई पवार महिला आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय,बारामती अंतर्गत सदर कॉमन फुड इनक्युबेशन सेंटर हे केंद्रीय अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालय (MoFPI) नवी दिल्ली यांच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) अंतर्गत स्थापन करण्यात आले आहे.या केंद्राच्या माध्यमातून अन्नप्रक्रिया क्षेत्रातील नवउद्योजक, विद्यार्थी,स्टार्टअप्स आणि सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांना आधुनिक पायाभूत सुविधा,यंत्रसामग्री, तांत्रिक मार्गदर्शन आणि इनक्युबेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. महाराष्ट्रात अशा प्रकारच्या खाद्यप्रक्रिया पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आणि त्यांचा प्रभावीपणे उपयोग करून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने मोलाचे सहकार्य केले आहे.



विद्यार्थ्यांनी विविध प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याबरोबरच प्रत्यक्ष सहभागातून 'Learning by Doing' या पद्धतीने खाद्यप्रक्रियेचा अनुभव घेतला. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी कॉमन फूड इनक्यूबेशन सेंटरमधील विविध खाद्यप्रक्रिया विभाग, यंत्रसामग्री,तांत्रिक सुविधा आणि प्रक्रिया पद्धतींची माहिती घेतली. भरडधान्यांची प्राथमिक व द्वितीय प्रक्रिया तसेच त्यापासून तयार होणाऱ्या विविध मूल्यवर्धित पदार्थांची निर्मिती याबाबत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.

फळे व भाजीपाला प्रक्रिया विभागात विद्यार्थ्यांना प्रक्रिया यंत्रणांची कार्यपद्धती,कच्च्या मालाची योग्य हाताळणी,उत्पादनाची गुणवत्ता, अन्नसुरक्षा, Good Manufacturing Practices, Good Handling Practices, पॅकेजिंग आणि मूल्यवर्धन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.तसेच फळे व भाजीपाल्यापासून ज्यूस, जॅम,स्मूदी आदी मूल्यवर्धित पदार्थ तयार करण्याची माहिती व प्रात्यक्षिके देण्यात आली. बेकरी विभागामध्ये कुकीज आणि पिझ्झा निर्मितीचे प्रात्यक्षिके करण्यात आली.

या भेटी दरम्यान श्री. सुहास ननावरे,श्रीमती सोनाली सस्ते,श्री.वैभव यादव,श्री. अभिजित देशमुख,श्री.अमर केंजळे आणि श्रीमती पूर्वजा जोशी,यांनी शारदाबाई पवार फूड इनक्यूबेशन सेंटरचे कामकाज, उपलब्ध पायाभूत सुविधा, यंत्रसामग्री आणि इनक्युबेशनच्या माध्यमातून विद्यार्थी,नवउद्योजक व स्टार्टअप्सना मिळणाऱ्या विविध संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी केंद्रीय अन्न प्रक्रिया मंत्रालयाचे संयुक्त सचिव श्री.देवेश देवेल, श्री. राजेंद्रदादा पवार,चेअरमन, ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती,श्री.विनयकुमार आवटे, संचालक, कृषी प्रक्रिया व नियोजन, कृषी आयुक्तालय,पुणे,कृषि विभाग,नीती आयोगाचे श्री.नंदन कुमार,पीएमएफएमईचे श्री.राकेश तिवारी तसेच अटल इन्क्युबेशन सेंटर,AIC ADT,बारामतीच्या सीईओ श्रीमती जया तिवारी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

> संकल्पनेपासून व्यवसायापर्यंतचा प्रवास समजला- स्वराली जाधव,डॉ.कलमाडी शामराव हायस्कूल,गणेशनगर, पुणे. या उपक्रमामुळे आम्हाला प्रथमच अन्नप्रक्रिया केंद्रातील आधुनिक यंत्रसामग्री व उत्पादन प्रक्रिया जवळून जाणून घेण्याची संधी मिळाली.भरडधान्यांपासून कुकीज व पिझ्झा,तसेच फळे व भाजीपाल्यांपासून जाम, ज्यूस व स्मूदी तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव अत्यंत प्रेरणादायी ठरला. या भेटीमुळे भविष्यात नावीन्यपूर्ण पिझ्झा सेंटर सुरू करण्याची मला प्रेरणा मिळाली.

# कथित बोगस आदिवासी प्रमाणपत्राविरोधात ठाणे महापालिकेवर आदिवासींचा धडक मोर्चा

## नगरसेविका पद रद्द करून पात्र आदिवासी उमेदवाराला संधी देण्याची मागणी; लकी भाऊ जाधव यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

■ **भिवंडी (दै. संध्या)**

अनुसूचित जमातीसाठी (एसटी) राखीव असलेल्या जागेवर निवडून आलेल्या नगरसेविकेच्या जातवैधता प्रमाणपत्रावर आक्षेप घेत, संबंधित नगरसेविका पद रद्द करून पात्र आदिवासी उमेदवाराला संधी द्यावी, या प्रमुख मागणीसाठी आदिवासी समाजाच्या नेते, कार्यकर्ते आणि महिलांनी ठाणे महानगरपालिका मुख्यालयावर धडक मोर्चा काढला. लकी भाऊ जाधव यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या मोर्चाला आदिवासी समाजाचा मोठा प्रतिसाद मिळाला.



संबंधित नगरसेविकेचे आदिवासी जात प्रमाणपत्र अवैध ठरवून त्यांचे नगरसेविका पद रद्द करावे, तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी जोरदार मागणी आंदोलकांनी केली.

ठाणे महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक ४ (अ) हा अनुसूचित जमातीसाठी राखीव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या जागेवरून सुलेखा सुधाकर चव्हाण निवडून आल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, त्यांच्या अनुसूचित जमातीच्या दाव्याबाबत आक्षेप घेण्यात आला असून, त्यांच्या जातवैधता प्रमाणपत्राच्या वैधतेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

या प्रकरणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद यांच्या वतीने पाठपुरावा करण्यात आला असल्याचे निवेदनात नमूद आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी आंदोलकांनी केली. आंदोलकांच्या निवेदनानुसार, संबंधित प्रकरणाची अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून तपासणी करण्यात आली असून १६ जून २०२६ रोजी समितीने निर्णय दिल्याचा दावा करण्यात आला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर संबंधित नगरसेविकेचे पद रद्द करून पुढील कायदेशीर व प्रशासकीय कार्यवाही तातडीने करावी, अशी मागणी करण्यात आली. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेवर अपात्र व्यक्तीला प्रतिनिधित्व मिळाल्यास खऱ्या आदिवासी उमेदवारांच्या घटनात्मक अधिकारांवर परिणाम होतो, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. या मागणीसाठी आदिवासी बांधव मोठ्या संख्येने ठाणे महानगरपालिका मुख्यालयासमोर एकत्र आले. महिला कार्यकर्त्यांसह विविध आदिवासी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले होते. हातात मागण्यांचे फलक घेत आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत आपला संताप व्यक्त केला. "बोगस आदिवासी हटवा, खऱ्या आदिवासींना न्याय द्या" अशा घोषणांनी महापालिका मुख्यालयाचा परिसर दणाणून गेला. लकी भाऊ जाधव यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या मोर्चात आदिवासी नेते,हंसराज खेवरा, आदिवासी सेवक महादेव घाटाळ, ट्रायबल फोरमचे, कोकण विभागीय कार्याध्यक्ष सुनील झळके, अमृत सुरकर, किरण खाडाम, वसंत गावित, दिनेश जाबर, तुकाराम वरठा, दीपक फुफाणे, कविता धिंडे आणि संतोष वड यांच्यासह अनेक आदिवासी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या मोर्चात आदिवासी महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपल्या मागण्यांना पाठिंबा दिला. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी उपस्थित आंदोलकांनी ठाणे मनपा आयुक्तांवर प्रश्नांच्या कैरी झाडत आयुक्तांना धारेवर धरले असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले, त्यामुळे आयुक्तांनी याबाबत तातडीने कारवाई करणार असल्याचे आश्वासन आंदोलकांना दिले. मोर्चादरम्यान आंदोलकांच्या शिष्टमंडळाने ठाणे महानगरपालिका प्रशासनाकडे निवेदन सादर करून या प्रकरणात तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली. आदिवासी समाजाच्या आरक्षणाचे आणि घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहावे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या राजकीय प्रतिनिधित्वाच्या जागांवर पात्र आदिवासींनाच न्याय मिळाला पाहिजे. आदिवासी समाजाच्या आरक्षणाचा कथित गैरवापर कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला. संबंधित प्रकरणात प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन न्याय दिला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही लकी भाऊ जाधव यांच्या नेतृत्वाखालील उपस्थित सर्व आंदोलकांनी महापालिका आयुक्तांना स्पष्ट शब्दात दिला.

### आंदोलकांच्या प्रमुख मागण्या

- संबंधित नगरसेविकेच्या जातवैधता प्रमाणपत्राबाबत झालेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी.
- संबंधित नगरसेविकेचे पद रद्द करून जागा रिक्त घोषित करावी.
- सदर अनुसूचित जमातीसाठी राखीव जागेवर पात्र आदिवासी उमेदवाराला संधी द्यावी.
- संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करावी.
- दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी.
- जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाची विलंब न करता अंमलबजावणी करावी.

## थोडक्यात पण महत्वाचे



### बारामतीत रहदारीस अडथळा ठरणाऱ्या १९ कंटेनर वाहनांवर दंडात्मक कारवाई

**बारामती : दैनिक संध्या**

शहरातील प्याजो कंपनीसमोरील रस्त्यावर रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने कंटेनर वाहने उभी करण्यात आल्याप्रकरणी प्रशासनाने धडक कारवाई केली. या कारवाईत एकूण १९ कंटेनर वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. प्याजो कंपनीसमोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कंटेनर वाहने उभी राहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, पोलीस उप अधीक्षक चैतन्य कदम, पोलीस निरीक्षक नारायण पवार तसेच प्रादेशिक परिवहन विभागाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. रस्त्यावर वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर संबंधित विभागाने कारवाई करत वाहनचालकांना नियमांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या. सार्वजनिक रस्त्यांवर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने वाहने उभी केल्यास यापुढेही कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. या संयुक्त कारवाईमुळे प्याजो कंपनी परिसरातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली असून, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रशासनाची करडी नजर राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले आहे.



### पोलीस बांधवांना राख्या बांधून रक्षाबंधन सण उत्साहात साजरा

**वडगाव निंबाळकर : दैनिक संध्या**

वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त सौ.ज्योतीताई लडकत,महिला तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस तसेच सामाजिक कार्यकर्त्या, सौ.पूजा गणेश जगताप,सौ.मीना दशरथ जगताप,सौ.शोभा गोरख जगताप,सौ.राणी बजरंग जाधव व सौ.हेमा गणेश खोडके यांनी पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलीस बांधवांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. तसेच पोलीस बांधव दिवस-रात्र कर्तव्य बजावत समाजाच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर असतात.त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत भाऊ-बहिणीच्या प्रेम,आपुलकी व विश्वासाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण यावेळी आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला.

### वडिलांच्या स्मरणार्थ भटक्या-विमुक्त जमातीतील विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी देणगी



**काळदरी : दैनिक संध्या**

ज्यांनी शिक्षकीपेशातील अनेक वर्षे कोकणातील अति दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्याला वाहून घेतले त्यांच्या स्मरणार्थ उच्च शिक्षित डॉ मुलाने तोच वसा पुढे चालवत श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित माहूर माध्यमिक विद्यालय माहूर .तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथील भटक्या-विमुक्त जमाती टिकवून ठेवण्यासाठी, चिंतामणी हॉस्पिटल सासवड चे स्त्रीरोगतज्ञ डॉ. संजय रावळ यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासासाठी ₹२१,०००/- (एकवीस हजार रुपये) इतकी आर्थिक मदत विद्यालयास भेट दिली. डॉ. रावळ यांनी ही मदत आपले वडील कै. गोविंद तात्योबा रावळ यांच्या स्मरणार्थ अर्पण केली. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली ही मदत निश्चितच प्रेरणादायी असून, समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अशा सामाजिक योगदानाचे महत्त्व मोठे आहे. यावेळी विद्यालयाच्या वतीने डॉ. संजय रावळ यांचे आभार मानण्यात आले. “विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दिलेला प्रत्येक हातभार त्यांच्या भविष्याला नवी दिशा देणारा ठरतो,” या भावनेतून डॉ. रावळ यांनी केलेल्या या योगदानाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# सासवडच्या सिद्धेश्वर मंदिरात श्रावणी सोमवारनिमित्त रंगले कवी संमेलन

■ **सासवड (दै. संध्या)**



श्रावण महिन्याची पवित्र पर्वणी आणि कऱ्हेकाठावरील निसर्गरम्य वातावरणात सासवड येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कऱ्हा सोशल फौंडेशन आणि श्री सिद्धेश्वर देवस्थानच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या संमेलनाने रसिकांची मने जिंकली. प्रसिद्ध कवी हनुमंत चांदगुडे यांनी या संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. संमेलनाच्या सुरुवातीला कवी हनुमंत चांदगुडे यांनी आपल्या सादरीकरणाने आणि काही प्रसिद्ध कवींच्या रचनांनी उपस्थितांच्या जोरदार टाळ्या मिळविल्या. त्यांना कवी अनिल कदम आणि हेमंत ताकवले यांनी आपल्या खुसखुशीत कविता व चारोळ्यांच्या साथीने सुरेख सूत्रसंचालन करत उत्तम साथ दिली.

या संमेलनात स्थानिक कवी अनिल कदम, वर्षा जगताप, कविता कोद्रे, स्नेहा शेवाळे, अश्विनी मोरे, सुनील हेंद्रे, ज्ञानेश्वर कामथे, विद्या जगताप, रेश्मा कामथे, निकीता कोलते, प्रिया जगताप, सचिन गोंधळी, शरज पाडसे आणि राजेश काकडे, गुरूकुलचे मेमाणे आदींनी आपल्या ओघवत्या वाणीतून निसर्ग, बाप, मरण, एकांतयात्रा, रानपाखरे आणि शेतकरी जीवन यांसारख्या संवेदनशील विषयांवर प्रभावी रचनांच्या सादरीकरणातून उपस्थितांना खिळवून ठेवले. कऱ्हा सोशल फौंडेशनचे सचिव गणेश मुळीक, सिद्धेश्वर देवस्थानचे संदीप जगताप, शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष हेमंत ताकवले, बाळासाहेब कुलकर्णी, सुधीर गुरव, जीवन कड, संभाजी महामुनी, जगदीश शिंदे यांनी संयोजन केले. यावेळी स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, दिपाली जगताप, गुरुकुल करीअर ॲकॅडमीचे प्रा. संदीप टिळेकर, शिल्पा हेंद्रे , राजाराम यादव, अमोल बागडे, प्रकाश मोरे, तानाजी सातव यांच्यासह मोठ्या संख्येने साहित्यिकप्रेमी आणि भाविक उपस्थित होते.

## रेणुका सांस्कृतिक कला केंद्रात रक्षाबंधन करून २५ वर्षांचे नाते जपले

■ **दौंड (दै. संध्या)**

तालुक्यातील बोरी पारधी, रेणुका सांस्कृतिक कला केंद्र येथे रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त दै.संध्याचे पत्रकार संजय सोनवणे व इतर पत्रकारांना रेणुका कला केंद्राच्या संचालिका रेखा ताई निर्लेकर सुषमा काळे यांनी भावनिक वातावरणात रक्षाबंधन साजरे केले. सांस्कृतिक लोक कलेमध्ये आमच्यासारख्या कलाकारांना मागील भूतकाळामध्ये सन्मानाची वागणूक मिळत नव्हती पायामध्ये घुंगरू बांधून रसिक जनांचे मनोरंजन करण्यासाठी सर्व ताकतीने स्टेजवर उतरावं लागतं अनेक वेळा काही रसिकांची गलिच्छ वागणूक सहन करून कार्यक्रम पुढे चालू ठेवावा लागतो महाराष्ट्रातील अनेक लावणी महोत्सव मध्ये सादरीकरण केले आहे आम्ही कलावंत जरी स्टेजवर नाचत असलो तरी गाण्यातील व लावणीतील शब्द कवी,लेखक,साहित्यिक, यांचेच असतात महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये साहित्य संमेलन भरवले जातात या कार्यक्रमाला आम्ही दोन्ही बहिणी व भाऊ बाळासाहेब काळे हजेरी लावतो साहित्य क्षेत्रामध्ये भरपूर काही शिकायला मिळतं याच कार्यक्रमांमध्ये ज्येष्ठ साहित्यिक दशरथ



यादव कवि संजय सोनवणे यांची 25 वर्षांपूर्वी माझी भेट झाली व बंधू भावाचे नाते टिकून ठेवले रेखाताई निर्लेकर सुषमा काळे यांनी मनोगत व्यक्त केले. जरी रक्तातील नात्यातील भाव नसला तरी संकटकाळी धावून येणारा खरा भाऊ ठरतो गेल्या २५ वर्षांपासून दोघांनी बहीण-भावाचे नाते जपले असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही रेखा ताईंनी संजय सोनवणे यांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी संजय सोनवणे यांनीही बहिणीच्या प्रेमाचा सन्मान राखत तिच्या कायम सुख-समृद्धीची सदिच्छा व्यक्त केली. रक्ताच्या नात्यापलीकडे जाऊन विश्वास, आपुलकी आणि जिव्हाळ्यावर उभे असलेले हे २५ वर्षांचे बहीण-भावाचे नाते उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरले.

## आळंदीत गणेशोत्सवात डीजे, लेझर-प्लाझ्मावर बंदी

इंद्रायणी नदीत विसर्जनास मनाई : आळंदीत गणेश मंडळांची पोलिस स्टेशनमध्ये बैठक

■ **आळंदी (दै. संध्या)**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आळंदी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली. गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यासाठी पोलिस प्रशासनाने मंडळांना विविध सूचना केल्या. चाकण विभागाचे सहायक पोलिस आयुक्त योगेश रांजणकर आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक बी.एस.नरके यांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. गणेशोत्सवासाठी पोलिस व प्रशासनाची आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. उत्सवादरम्यान डीजेचा वापर करू नये, तसेच मिरवणुकीत लेझर व प्लाझ्माचा वापर करण्यास बंदी असल्याचे सांगण्यात आले. गणेश दर्शनासाठी महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा कराव्यात, मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, तसेच मंडपात जुगार व मद्यपान होणार नाही, याची मंडळांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना करण्यात आल्या. चाकण चौक, वडगाव रोड व मरकळ रोडवरून येणाऱ्या विसर्जन मिरवणुका चावडी चौकातून पोलिसांच्या सूचनेनुसार



मार्गस्थ होतील, अशी माहिती देण्यात आली. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी इंद्रायणी नदीत गणेशमूर्ती विसर्जनास बंदी असल्याचे सांगितले. नगरपरिषदेच्या वतीने वडगाव रोडवरील पार्किंगच्या ठिकाणी कृत्रिम तलाव उभारण्यात येणार असून, त्यातच गणेशमूर्तींचे विसर्जन करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच निर्माल्य नदीत किंवा रस्त्यावर न टाकता नगरपरिषदेच्या निर्माल्य कुंडातच टाकावे, असेही त्यांनी सांगितले. विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील खड्डे बुजविण्यात येतील, अशी माहितीही त्यांनी दिली.

बैठकीस डि.डि.भोसले पाटील, प्रकाश कुऱ्हाडे, उत्तम गोगावले, आनंदराव मुंगसे, पांडुरंग गावडे, अजित वडगावकर, नगरसेवक गोविंद कुऱ्हाडे, महेश गोरे, सचिन घुंडरे, युवराज वहीले, निसार सय्यद, ज्ञानेश्वर गुळुंजकर, सुदीप गरुड यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मळद येथील २९ सदस्यांचे आदर्श एकत्रित कुटुंब : शेती, संस्कार आणि कष्टांची प्रेरणादायी कहाणी

मळद - मळद येथील चव्हाण (वरे) यांचे दिशादर्शक एकत्र कुटुंब, शेतीची नाळ आणि संस्कारांची शिदोरी

**मळद (दै. संध्या)**

आजच्या धावपळीच्या आणि विभक्त कुटुंबांच्या काळात चार भावंडांनी आपले एकत्रित कुटुंब टिकवून ठेवत शेती, व्यवसाय, नोकरी आणि सामाजिक जीवनात उल्लेखनीय प्रगती साधणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

श्री. रामदास गुलाबराव चव्हाण (वरे), श्री. बाळासाहेब गुलाबराव चव्हाण (वरे), कृषिभूषण श्री. प्रल्हाद गुलाबराव चव्हाण (वरे) आणि श्री. हनुमंत गुलाबराव चव्हाण (वरे) या चार भावंडांचे हे कुटुंब आजही एकत्रितपणे नांदत आहे. चारही भावंडांनी शेतीला आपला मुख्य आधार मानून कष्ट, प्रामाणिकपणा आणि आधुनिक शेतीची कास धरली आहे. थोरले श्री. रामदास गुलाबराव वरे व सौ. सुमन रामदास वरे, त्यानंतर श्री. बाळासाहेब गुलाबराव वरे व सौ. लता बाळासाहेब वरे, कृषिभूषण श्री. प्रल्हाद गुलाबराव वरे व सौ. संगीता प्रल्हाद वरे, आणि श्री. हनुमंत गुलाबराव वरे—सौ शितल हनुमंत चव्हाण (वरे) ही चारही



भावंडे आपापल्या जबाबदाऱ्या व्यवस्थित सांभाळत शेतीमध्ये उत्तम कार्य करत आहेत. या कुटुंबाचे वैशिष्ट्य म्हणजे शेतीकडे केवळ उत्पन्नाचे साधन म्हणून न पाहता, ती जीवनाची संस्कृती आणि मातीशी जोडलेले नाते म्हणून पाहिले जाते. कष्ट, नियोजन, परस्पर सहकार्य आणि नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार यामुळे या कुटुंबाला शेतीमधून उत्पादन चांगले मिळत आहे. कुटूंबात एकुण सहा मुले, पाच मुली व नातवंडे व परतवंडे अशी कुटुंबाची पुढची पिढी संख्येने मोठी आहे. यापैकी एका मुलाचे लग्न सोडुन बाकी सर्वांची लग्ने झालेली आहेत.

या कुटुंबातील विशेष अभिमानाची बाब म्हणजे सर्व सदस्य निर्व्यसनी व एकमेकांस समजुन घेणारी आहेत. आजच्या काळात तरुण पिढीसमोर अनेक आव्हाने असताना, कुटुंबातील प्रत्येक सदस्याने चांगले संस्कार, पारदर्शक व्यवहार, कठोर मेहनत आणि पडेल त्या जबाबदारीची वाट निवडली आहे. कुटुंबातील काही मुले खासगी कंपन्यांमध्ये नोकरी करत आहेत, तर काहींनी स्वतःचे व्यवसाय सुरू करून उद्योग-व्यवसायाच्या क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. त्यामुळे एकीकडे शेतीची परंपरा जपली जात असतानाच दुसरीकडे शिक्षण, नोकरी आणि व्यवसायाच्या माध्यमातून नवीन संधींचा स्वीकार केला जात आहे.

या कुटुंबातील एकूण सदस्यसंख्या तब्बल २९ आहे. एवढे मोठे कुटुंब एकत्रितपणे प्रेमाने आणि गुण्यागोविंदाने राहणे ही आजच्या काळात खरोखरच कौतुकास्पद गोष्ट आहे. घरातील मोठ्यांचा अनुभव, तरुणांची ऊर्जा आणि लहानांचे निरागस हास्य यामुळे हे घर केवळ राहण्याची जागा न राहता प्रेम, आपुलकी, संस्कार आणि सहकार्याचे माहेरघर बनले आहे. मतभेद असतील, विचार वेगळे असतील; मात्र मनामध्ये एकमेकांविषयीचा आदर आणि कुटुंबाबद्दलची बांधिलकी कायम आहे. संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे आणि आनंदाच्या क्षणी तो आनंद सर्वांनी मिळून साजरा करणे, हीच या कुटुंबाची खरी श्रीमंती आहे. आज शेती करणाऱ्या कुटुंबांसमोर अनेक अडचणी आहेत. तरीही या कुटुंबाने शेतीची नाळ तोडलेली नाही. उलट आधुनिक विचार, कष्ट आणि कुटुंबातील एकजूट यांच्या जोरावर शेतीसोबत नोकरी आणि व्यवसायालाही प्रोत्साहन दिले आहे.

चार भावंडांची एकजूट, २९ सदस्यांचे एकत्रित कुटुंब, निर्व्यसनी जीवन, शेतीवरील प्रेम आणि पुढच्या पिढीची प्रगती—या सर्वांचा सुंदर संगम म्हणजे वरे कुटुंब. आजच्या विभक्त कुटुंबांच्या युगात हे कुटुंब एक सुंदर संदेश देते— “घर मोठे असण्यापेक्षा मन मोठे असावे; कुटुंब मोठे असण्यापेक्षा एकमेकांना समजून घेणारे असावे. मातीशी नाते, कष्टावर विश्वास आणि माणसांशी प्रेम असेल, तर एकत्र कुटुंब हीच आयुष्याची सर्वात मोठी ताकद ठरते.” शेती जपा, संस्कार जपा आणि कुटुंबाची एकजूट जपा—यातूनच समृद्ध समाजाची निर्मिती होते.


# बारामती शहर पोलिसांची धडक कारवाई

**एकाच दिवशी दोन मटका अड्ड्यांवर छापे; शैक्षणिक संस्थेच्या परिसरातील तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवरही कारवाई**

■ “अवैध धंदा कुठेही असो, माहिती द्या; कायदेशीर कारवाई निश्चित” — बारामती शहर पोलिसांचे नागरिकांना आवाहन

■ **बारामती (दै. संध्या)**

बारामती शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, अवैध धंद्यांना आळा घालणे आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे या उद्देशाने बारामती शहर पोलिसांनी दिनांक 31/08/2026 रोजी एकाच दिवशी तीन स्वतंत्र ठिकाणी धडक कारवाई केली. यामध्ये दोन ठिकाणी सुरू असलेल्या कल्याण मटका जुगारावर छापे टाकण्यात आले, तर शैक्षणिक संस्थेच्या 100 मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री केल्याप्रकरणी स्वतंत्र कायदेशीर कारवाई करण्यात आली. मा. अपर पोलीस



अधीक्षक श्री. गणेश बिरादार साहेब व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली, बारामती शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

बारामती शहरातील पानगली परिसरात कल्याण मटका जुगार सुरू असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना प्राप्त झाली. माहितीची पडताळणी करून पोलीस पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला.

या कारवाईत अभिजीत किशोर शिंदे, वय 27 वर्षे, रा. पानगली, बारामती यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून रु. 560/- रोख रक्कम, मटका जुगारासाठी वापरण्यात येणारी स्लीप बुक, आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या व लेखनसाहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी बारामती शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. 354/2026, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, 1887 चे कलम 12(अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

त्यानंतर बारामती शहरातील सटवाजीनगर, न्यू टी हाऊस परिसरात कल्याण मटका जुगार सुरू असल्याची माहिती प्राप्त झाली. पोलीस पथकाने तत्काळ घटनास्थळी जाऊन पंचांसमक्ष कारवाई केली. या ठिकाणी चंदन अशोक खुलसे, वय 25 वर्षे, रा. प्रबुद्धनगर, आमराई, बारामती यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून रु. 610/- रोख रक्कम, दोन स्लीप बुक, जुगाराच्या आकड्यांच्या नोंदी असलेल्या चिठ्ठ्या व लेखनसाहित्य जप्त करण्यात आले.

याप्रकरणी बारामती शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. 355/2026, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, 1887 चे कलम 12(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बारामती शहर पोलिसांनी केवळ जुगारासारख्या अवैध धंद्यांवरच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या आरोग्याला व सार्वजनिक हिताला बाधा पोहोचविणाऱ्या प्रकारांवरही कारवाई केली. माळेगाव कॉलनी, शारदानगर येथील आर.जी. ट्रेडर्स या ठिकाणी, शारदाबाई पवार महाविद्यालय या शैक्षणिक संस्थेच्या 100 मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवून विक्री केली जात असल्याचे आढळून आले. याप्रकरणी रविंद्र मोहनलाल गायकवाड, वय 38 वर्षे, रा. देवगिरी पार्क, जामदार रोड, कसबा, बारामती याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. सदर प्रकरणी बारामती शहर पोलीस स्टेशन खटला रजि. नं. 06/2026, सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने नियंत्रण कायद्याचे कलम 6(ब) व शिक्षा कलम 24 अन्वये खटला दाखल करण्यात आला आहे.

बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत मटका, सट्टा, जुगार, अवैध दारू, ताडी-माडी, गांजा व इतर अंमली पदार्थांची विक्री, ऑनलाइन जुगार, प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदेशीर विक्री किंवा कोणताही अन्य अवैध धंदा सहन केला जाणार नाही. अवैध धंदा कोणाचा आहे, तो कोणत्या भागात चालतो किंवा त्यामागे कोणाचा प्रभाव आहे, याचा विचार न करता कायद्याच्या चौकटीत निष्पक्ष आणि ठोस कारवाई केली जाईल, ही बारामती शहर पोलिसांची स्पष्ट भूमिका आहे.

विश्वसनीय माहिती देणाऱ्या नागरिकांची ओळख आवश्यकतेनुसार गोपनीय ठेवण्यात येईल. बारामती शहर पोलिसांसाठी नागरिकांचा विश्वास हीच सर्वात मोठी ताकद आहे. कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे करणे आणि त्याचवेळी प्रत्येक नागरिकाला सुरक्षिततेची भावना निर्माण करणे, यासाठी बारामती शहर पोलीस कटिबद्ध आहेत. “अवैध धंदा दिसला तर दुर्लक्ष करू नका — डायल 112 वर माहिती द्या.” “माहिती नागरिकांची, पडताळणी पोलिसांची आणि कारवाई कायद्याची.” “कायद्यापुढे सर्व समान — अवैध धंद्यांना बारामती शहरात थारा नाही.” “सुरक्षित बारामतीसाठी नागरिक आणि पोलीस एकत्र.”

### बारामतीकरांना खुले आवाहन

शहरातील नागरिक, पत्रकार, लोकप्रतिनिधी, माजी व विद्यमान नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी आणि जागरूक नागरिक यांनी शहरात कोणताही अवैध धंदा सुरू असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची माहिती तात्काळ डायल 112 किंवा बारामती शहर पोलीस स्टेशनला द्यावी. शक्य असल्यास संबंधित ठिकाणाचे अचूक लोकेशन, फोटो किंवा व्हिडिओ सुरक्षित अंतरावरून पोलिसांना उपलब्ध करून द्यावेत. नागरिकांनी स्वतः संबंधित व्यक्तींशी वाद घालू नये किंवा कारवाई करण्याचा प्रयत्न करू नये. माहिती मिळाल्यानंतर पोलीस पथक संबंधित ठिकाणी पोहोचून वस्तुस्थितीची पडताळणी करेल आणि आवश्यक ती कायदेशीर कारवाई करेल.